# प्रकरण सहावे

## पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेचा शेतक-यांवरील परीणाम

### भाग दुसरा

---


६.१ पीक पध्दती

६.२ बाजार आवारात आणण्यात अडचणी

६.३ व्यापारी वा दलालांद्वारा स्थानिक खरेदी

६.४ कमिशन एजंटची गरज

६.५ बाजारातील व्यापा-यांचा दुराचार

६.६ व्यापा-यांचा दुराचार दूर करण्यासाठी सूचना

६.७ बाजार फी ची निश्चितता

६.८ बाजारातील मालाची कटावट

६.९ शेतमाल विक्रीसाठीचा कालावधी

६.१० निर्यातदार व इतर एजन्सी मार्फत शेतमालाची प्रत्यक्ष विक्री बाबत शेतक-यांचे मत

६.११ पंढरपूर कृषि उत्पन्न बाजाराबाबत कृषकांच्या अडचणी

६.१२ पंढरपूर बाजार आवाराबाबत शेतक-यांनी केलेल्या सूचना


---

# प्रकरण सहावे

## पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेचा शेतक-यांवरील परीणाम

## भाग दुसरा

मागील प्रकरणामध्ये शेतक-यांच्या मतानुसार शेतक-यांचे शेतमालाच्या उत्पादन व विक्री संदर्भात वर्तन व त्या अनुषंगाने येणा-या इतर बाबींचा अभ्यास केला. प्रस्तुत प्रकरणामध्ये कृषकाच्या दृष्टीने शेतमाल विक्री होईतोपर्यंत शेतमालाशी संबधित शेतक-यांशिवाय इतर घटकांमार्फत होणा-या वर्तनाचा अभ्यास व त्या अनुषंगाने येणा-या बाबींचा अभ्यास केला आहे. कृषि बाजार स्थापनेमुळे शेतक-यांच्या पीक पध्दतीत झालेला बदल अभ्यासला आहे. तसेच कृषि उत्पन्न बाजारात जाण्यात येणारे अडथळे, व्यापारी वा दलाला-व्दारे शेतमालाची ग्रामीण भागातच खरेदी, कमिशन एजंटची गरज, बाजारा-तील व्यापा-यांचा दुराचार, व्यापा-यांचा दुराचार दूर करण्यासाठी सूचना, बाजार फी, बाजारात सततची कपात, शेतमाल विक्रीसाठी लागणारा कालावधी, निर्यातदार व इतर एजन्सी मार्फत शेतमालाची प्रत्यक्ष विक्री याबाबत अभ्यासाखालील सैंपी शेतक-यांची मते जाणून घेऊन पृथक्करण दिले आहे. तसेच शेतक-यांनी पंढरपूर कृषि उत्पन्न बाजाराबाबत आढळलेल्या समस्या अडथळयाचे आणि शेतक-यांच्या सूचनांचा अभ्यास येथे केला आहे.

### ६.१ पीक पध्दती :

पंढरपूर येथे कृषि उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाल्यानंतर या मार्केट यार्डच्या अधिकारात येणा-या गांवातील शेतक-यांना आपल्या शेतमालास निश्चित बाजारपेठ उपलब्ध झाली. शेतमालाची निश्चित किंमत मिळू लागली. याचा परिणाम या गांवातील पिक पध्दतीवर किती व

कोणत्या प्रकारे झाला हे पहाण्याचा प्रयत्न या सर्वेक्षणाचा एक भाग म्हणून केलेला आहे.

६.१.१ अन्नधान्ये, कडधान्ये, गळितधान्ये व व्यापारी पीके :

तक्ता क्रमांक ६.१ मध्ये १९७७-७८ व १९८७-८८ या दोन वर्षांतील पीक पध्दतीचा तुलनात्मक अभ्यास दिला आहे. देशी पीकांच्या व संकरीत पीकांच्या बाबतीत हे मांडले आहे. तसेच अन्नधान्य, कडधान्ये, गळीतधान्ये व व्यापारी पीके या चार भागात प्रत्येक प्रकारचे पीक घेणा-या शेतक-यांची संख्या दिली आहे.

देशी अन्नधान्यांच्या बाबतीत गहू पीक पिकविणा-यांच्या संख्येत या दशकात वाढ झालेली दिसते. तर बाकीच्या पीकांच्या बाबतीत शेतक-यांच्या संख्येत घट झाली आहे. या विरुध्द संकरीत धान्ये पिकविणा-यांच्या संख्येत वाढ झाली आहे. देशी ज्वारी पिकविणा-यांच्या संख्येत १०.५० टक्क्यांनी घट झाली तर संकरीत ज्वारी पिकविणा-यांच्या संख्येत ३७.५ टक्क्यांनी वाढ झाली. बाजरी पिकविणा-यांच्या संख्येत दोन्ही गटात पडलेला फरक तर नजरेत भरण्याजोगा मोठा आहे. तसेच मका पिकविणा-यांतही संकरीत जातीकडे ओढा दिसून येतो. मात्र भात पिकविणे पूर्णपणे बंद झाले आहे.

कडधान्यांच्या बाबतीत देशी पीक घेणा-यांच्या संख्येत झालेल्या घटीच्या मानाने संकरीत पीक घेणा-यांच्या संख्येत झालेली वाढ कमी आहे. पण आता कडधान्यांच्या संकरीत जातीकडे उशीराने का होईना पण लोक वळू लागले आहेत.

गळीत धान्यांच्या गटात देशी भुईमुग पिकविणा-यांची संख्या ११२.५० टक्क्यांनी वाढली असली तरी संकरीत बियाणे पेरणा-यांची संख्या कायम राहिली आहे. गळीताची इतर धान्ये घेणा-यांची संख्या घटत आहे. ही चिंतीय बाब आहे.

| | | १९७७-७८ | १९८७-८८ | १९७७-७८ | १९८७-८८ |
|---|---|---|---|---|---|
| | **अन्नधान्ये :** | | | | |
| १] | ज्वारी | ५७ [७१.२५] | ५१ [६३.७५] | ८ [ १० ] | ११ [१३.७५] |
| २] | बाजरी | १० [१२.५ ] | ५ [ ६.२५] | १ [१.२५] | ५ [ ६.२५] |
| ३] | मका | १७ [२१.२५] | १६ [ २० ] | ४ [ ५ ] | ८ [ १० ] |
| ४] | गहू/साळी | ३२ [ ४० ] | ३४ [४२.५ ] | २ [ २.५] | ९ [११.२५] |
| ५] | नाचणी | ६ [ ७.५ ] | - | - | - |
| | **कडधान्ये :** | | | | |
| ६] | तूर | ५ [ ६.२५] | २ [ २.५ ] | - | २ [ २.५ ] |
| ७] | हरभरा | २४ [ ३० ] | १३ [१६.२५] | - | २ [ २.५ ] |
| ८] | मूग | २ [ २.५ ] | - | - | - |
| ९] | मटकी | १५ [१८.७५] | ३ [ ३.७५] | - | १ [ १.२५] |
| १०] | कुळगा | ९ [११.२५] | २ [ २.५ ] | - | १ [ १.२५] |
| | **गळीत धान्ये :** | | | | |
| ११] | भुईमूग | ८ [ १० ] | १७ [२१.२५] | २ [२.५ ] | २ [ २.५ ] |
| १२] | करडई | १० [१२.५ ] | ५ [ ६.२५] | - | १ [ १.२५] |
| १३] | सुर्यफूल | ७ [ ८.७५] | ६ [ ७.५ ] | - | १ [ १.२५] |
| १४] | जवस | ३ [ ३.७५] | ४ [ ५ ] | - | - |
| १५] | एरंडी | १ [ १.२५] | - | - | - |
| | **व्यापारी पीके :** | | | | |
| १६] | ऊस | १०[१२.५ ] | ४६ [५७.५ ] | १ [१.२५ ] | ७ [ ८.७५ ] |
| १७] | कापूस | ७ [ ८.७५ ] | १२ [ १५ ] | - | - |
| १८] | द्राक्ष | २ [ २.५ ] | २ [ २.५ ] | - | - |
| १९] | डाळिंब | - | १ [ १.२५] | - | १ [ १.२५] |
| २०] | भाजीपाला | २ [ २.५ ] | ३ [ ३.७५] | - | - |
| २१] | मिरची | २ [ २.५ ] | ६ [ ७.५ ] | - | - |
| २२] | कांदा | ६ [ ७.५ ] | १२ [ १५ ] | - | - |
| २३] | कडवळ | ५ [ ६.२५] | ८ [ १० ] | - | - |
| २४] | पानमळा | १ [ १.२५] | - | - | - |

टीप : कंसातील आकडे एकूण शेतक-यांमधील टक्केवारी आहे.



तक्ता क्रमांक ६.१

अन्नधान्ये, कडधान्ये, गळीतधान्ये, व्यापारी पीके

| क्र.नं. | पीक | देशी पीक | संकरीत पीक |
| --- | --- | --- | --- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **रबी पीके :** | | | | |
| १] | ज्वारी | ५७ [७१.२५] | ५१ [६३.७५] | ८ [ १० ] | ११ [१३.७५] |
| २] | गहू/जवळी | ३२ [ ४० ] | ३४ [४२.५ ] | २ [ २.५ ] | ९ [११.२५] |
| ३] | ताळी | ६ [ ७.५ ] | - | - | - |
| ४] | करडई | १० [१२.५ ] | ५ [ ६.२५] | - | १ [ १.२५] |
| ५] | हरभरा | २४ [ ३० ] | १३ [१६.२५] | - | २ [ २.५ ] |
| ६] | मिरची | २ [ २.५ ] | ६ [ ७.५ ] | - | - |
| ७] | कांदा | ६ [ ७.५ ] | १२ [ १५ ] | - | - |
| | **खरीप पीके :** | | | | |
| ८] | बाजरी | १० [१२.५ ] | ५ [ ६.२५] | १ [ १.२५ ] | ५ [ ६.२५] |
| ९] | मका | १७ [२१.२५] | १६ [ २० ] | ४ [ ५ ] | ८ [ १० ] |
| १०] | भुईमुग | ८ [ १० ] | १७ [२१.२५] | २ [ २.५ ] | २ [ २.८ ] |
| ११] | सुर्यफुल/कारळ | ७ [ ८.७५] | ६ [ ७.५ ] | - | १ [ १.२५] |
| १२] | जवस | ३ [ ३.७५] | ४ [ ५ ] | - | - |
| १३] | एरंडी | १ [ १.२५] | - | - | - |
| १४] | तूर | ५ [ ६.२५] | २ [ २.५ ] | - | २ [२.५ ] |
| १५] | मूग | २ [ २.५ ] | - | - | - |
| १६] | मटकी | १५ [१८.७५] | ३ [ ३.७५] | - | १ [ १.२५] |
| १७] | हुलगा | ९ [११.२५] | २ [ २.५ ] | - | १ [ १.२५] |
| १८] | कापूस | ७ [ ८.७५] | १२ [ १५ ] | - | - |
| | **बारमाही पीके :** | | | | |
| १९] | कडवळ | ५ [ ६.२५] | ८ [ १० ] | - | - |
| २०] | भाजीपाला | २ [ २.५ ] | ३ [ ३.७५] | - | - |
| २१] | पानमळा | १ [ १.२५] | - | - | - |
| २२] | ऊस | १० [१२.५ ] | ४६ [५७.५ ] | १ [ १.२५] | ७ [ ८.७५] |
| २३] | डाळिंब | - | १ [ १.२५] | - | १ [ १.२५] |
| २४] | द्राक्ष | २ [ २.५ ] | २ [ २.५ ] | - | - |

टीप : कंसातील आंकडे एकूण शेतक-यांमधील टक्केवारी आहे.



## तक्ता क्रमांक ६.२

## रब्बी, खरीप बारमाही पीके

| अ.नं. | पीके | देशी पीक | | संकरीत पीक | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९७७-७८ | १९८७-८८ | १९७७-७८ | १९८७-८८ |

रोखीच्या पीकात ऊस हेच महत्वाचे पीक आहे. ऊस पिकविणा--यांच्या संख्येत ही वाढ होण्याचे साखर कारखान्याची स्थापना महत्वाचे कारण होय. कापूस [७१.४३ टक्के वाढ], भाजीपाला [५०.०० टक्के वाढ], मिरची [२००.०० टक्के वाढ], कांदे [१०० टक्के वाढ] आणि कडवळ [६०.०० टक्के वाढ] या पिकांच्या उत्पादनाकडे शेतकरी मोठया प्रमाणात वळलेले दिसतात. असाचे संकरीत बियाणे वापरणा-या शेतक-यांच्या संख्येत या दशकाच्या कालावधीत मोठी [६०० टक्के] वाढ झालेली दिसते. डाळींबाची लागवड करण्यातही शेतकरी पुढाकार घेत आहेत.

### ६.१.२ रबी, खरीप व बारमाही पीके :

रब्बी, खरीप व बारमाही पिकांच्या बाबतीत या दहा वर्षांच्या कालावधीत पीक पध्दतीत झालेला बदल विचारात घेतला असता तक्ता क्र. ६.२ वरुन असे दिसून येते की, एकूण रब्बी पीक घेणा-यांची संख्या १९७७-७८ मध्ये १५७ होती ती घटून १९८७-८८ मध्ये १२१ झाली. म्हणजे या संख्येत २३ टक्क्यानी घट झाली. पण रब्बी संकरीत पीके घेणा-यांच्या संख्येत मात्र या दशकात १३० टक्क्यानी वाढ झाली. रब्बी पिकात देशी व संकरीत जातीतील गहू पिकविणा-यांच्या संख्येत वाढ झाली. तसेच देशी मिरची [२०० टक्के वाढ] व देशी कांदा [१०० टक्के वाढ] पिकविणा-यांच्या संख्येतही वाढ झाली. इतर रब्बी पीके घेणा-यांची संख्या दशकात घटली.

खरीप पीके देशी पध्दतीने घेणा-यांच्या संख्येत या दशकात २१.१८ टक्क्यांनी घट झाली तर संकरीत पीके घेणा-यांच्या संख्येत १८५.७१ टक्क्यांनी वाढ झाली. देशी पिकात भुईमुग [११२.५ टक्के वाढ] व कापूस [७१.४३२ टक्के वाढ] ही दोन पीके घेणा-या शेतक-यांच्या संख्येत वाढ झाली. तर बाजरी [ ५० टक्के घट], एरंडी [१०० टक्के घट], तूर [६६.६७ टक्के घट], मुग [१०० टक्के घट], मटकी [८० टक्के घट] आणि हुलगा [७७.७८ टक्के घट]

ही पीके घेणा-या शेतक-यांची संख्या बरीच घटली. संकरीत पध्दतीने बाजरी [४००० टक्के वाढ], मका[१०० टक्के वाढ] पिकविणारे शेतकरी वाढले तर सुर्यफूल, तूर, मटकी, हुलगा संकरीत पिकविण्याची नवीन प्रथा पडू लागली.

बारमाही पीके घेणा-यांची संख्या दहावर्षांच्या काळात वीस वरून ४९ पर्यंत [१४५ टक्क्यांनी] वाढली. तसेच ऊस पिकविणारे ३६० टक्क्यानी वाढले, केळवळ पिकविणारे ६० टक्क्यानी वाढले. संकरीत ऊस पिकविणा-यांची संख्याही एकावरून सातावर गेली. एकूणच बारमाही पीके घेणा-यांच्या पीक पध्दतीत महत्वाचे व व्यापारीकरण दर्शविणारे बदल घडून आले आहेत.

देशी पध्दतीने रबी व खरीप पीके घेणा-यांच्या संख्येत या दशकात ५४ नी घट झाली तर बारमाही पीके घेणा-यांच्या संख्येत ३९ नी वाढ झाली. संकरीत पध्दतीने रबी पीके व खरीप पीके घेणा-यांची संख्या प्रत्येकी १३ ने वाढली तर बारमाही पीके घेणा-यांची संख्या ७ ने वाढली.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पंढरपूर येथे कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना व सोलापूर जिल्ह्यातील श्रीपूर [बोरगांव], माळीनगर [अकलूज], शंकरनगर [अकलूज], सदाशिवनगर [पुरंदावडे], कुमठे वेणूनगर [गुरसाळे], तुळसीदासनगर [कुर्डू], महाडिकनगर [टाकळी-सिकंदर] येथील आणि जिल्याबाहेरील साखर कारखान्यांच्या स्थापनेमुळे या आठ गांवातील पीक पध्दतीत फार मोठा फरक झाला. साधारणपणे धान्यां-कडून व्यापारी पीके घेण्याकडे कल वदलत असलेला दिसून येतो. देशी अन्नधान्य व कडधान्ये घेणा-यांची संख्या या दशकात अनुक्रमे १६ व ३६ नी घटली तर गळीताची धान्ये व व्यापारी पीके पिकविणा-यांची संख्या अनुक्रमे तीन व ५५ नी वाढली. संकरीत पध्दतीत मात्र सर्वच गटात वाढ दिसून येते.

संकरीत पध्दतीने अन्नधान्य पिकविणा-यांच्या संख्येत [१८ ने वाढ] झालेली वाढ इतर गटात झालेल्या वाढीपेक्षा [१४ ने वाढ] जास्त आहे. शेतीच्या व्यापारीकरणात व बारमाही करणातील असावा वाटा उणे केल्यास रहाणारा परीणाम व्यापारीकरणात थोडा वरा असला तरी बारमाही करणात फारसा नाही. हा वरा पंढरपूरच्या बाजार समितीच्या कार्याचा पीक पध्दतीवर झालेला परीणाम होय.

६.२ बाजार आवारात जाण्यात अडथळे :

बहुसंख्य [] ८६.२५ टक्के [] शेतक-यांनी बाजार आवारात जाण्यात अडथळे येत नाहीत असे सांगितले. व्यापारी व दलालाव्दारे बाजारपेठेत जाण्यास अडथळा होतो म्हणणारे [क्रमश: ११.२५ व २.५ टक्के] अल्पसंख्यांत शेतकरी आहेत.

६.३ व्यापारी वा दलालाव्दारा स्थानिक खरेदी :

बहुतांशी शेतकरी [६६.२५ टक्के] आपला शेतमाल पंढरपूरच्या कृषि उत्पन्न बाजार समितीकडे नेऊन विकतात. तर काही कृषकांचा [३३.७५ टक्के] कापूस, मिरची या सारख्या शेतमालाची खरेदी दलाल व व्यापारी ग्रामीण भागातूनच करतात असे दिसून येते.

६.४ कमिशन एजंटची गरज :

शेतमाल विकण्यासाठी कमिशन एजंटची गरज नाही असे फक्त १९ [२३.७५ टक्के] शेतक-यांना वाटते तर ६१ [७६.२५ टक्के] शेतक-यांच्या मते विविध कारणासाठी कारणासाठी का होईना पण एजंटची शेतमालाच्या विक्रीसाठी जरूरी आहे. कमिशन एजंटविनाविलंब शेतमालाची विक्री करतो हे बहुतेक शेतक-यांच्यादृष्टीने [५३.७५ टक्के] आकर्षण आहे. त्याच बरोबर

२० [२५ टक्के] शेतकरी एजंट शेती पुरवीपेसाठी कर्ज आणि उधार देतो म्हणून आणि १५ [१८.७५ टक्के] शेतकरी एजंट साठवणुकीची सोय करून शेतमालास संरक्षण देतो म्हणून एजंटच्या बाजूने कौल देतात. बारा [१५ टक्के] शेतकरी कमिशन एजंट विक्री उत्पन्नाची माहिती देतो व बाजार माहिती देतो म्हणून एजंट असावा असे म्हणतात तर ८ [१०टक्के] शेतकरी मागणी नसलेला मालही कमिशन एजंट विकतो म्हणून तो पसंत करतात.

६.४.१ शिक्षण निहाय कमिशन एजंटची गरज :

तक्ता क्रमांक ६.३ वरून उच्च शिक्षित शेतक-यांचा अपवाद वगळता सर्व शैक्षणिक स्तरातील शेतक-यांनी कमिशन एजंटच्या अस्तित्वाचे समर्थन केले. सर्व शिक्षणगटातील शेतक-यांच्या मते कमिशन एजंट शेतमालाची विना विलंब विक्री करतो हे महत्वाचे आहे. निरक्षर शेतक-यांच्या दृष्टीने कमिशन एजंट शेतमालाच्या साठवणुकीची सोय करतो तर प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गटातील शेतक-यांच्या मते कमिशन एजंट शेतमालाच्या पुरवीपेसाठी कर्ज अथवा उधार देतो हे दुस-या क्रमांकाचे एजंटच्या पसंतीमागील कारण आहे.

६.४.२ व्यवसाय निहाय कमिशन एजंटची गरज :

इतर व्यवसायिक शेतक-यापैकी ५ [२६.३२ टक्के], मजूर शेतक-यापैकी एकजण [२५ टक्के], व फक्त शेती व्यवसाय करणा-यापैकी १७ [१७.३५ टक्के] शेतकरी कमिशन एजंटची गरज नाही असे म्हणणारे आहेत. कमिशन एजंट शेतमालाची किंमत तावडतोब देऊ शकतो हे सर्व व्यवसाय गटातील शेतक-यांच्या दृष्टीने मोठे आमिष आहे. म्हणजे आजही शेतक-यांचे आर्थिक दारिद्र्य या गोष्टीतून प्रतीत होते. तो उधार देतो हे त्याच्या

## तक्ता क्रमांक ६.३

### शिक्षण निहाय कमिशन एजंटची गरज

| शिक्षण | शेती प्रक्रियेसाठी कर्ज व उचल देतो | साठवणूक सोय व शेतमालास संरक्षण | विनाविलंब विक्री करतो | विक्री उत्पन्नाची हमी व बाजार माहिती देतो | मागणी नसलेल्या मालाची विक्री करतो | कमिशन एजंटची गरज नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| निरक्षर | २<br>[८.३४]<br>[१०] | ५<br>[२०.८४]<br>[३३.३४] | ७<br>[२९.१७]<br>[१६.२८] | ३<br>[१२.५]<br>[२५] | ३<br>[१२.५]<br>[३७.५] | ४<br>[१६.६७]<br>[१७.३९] | २४<br>[१००]<br>[१९.८३] |
| प्राथमिक | ९<br>[१७.६५]<br>[४५] | ७<br>[१३.७३]<br>[४६.६७] | १८<br>[३५.२९]<br>[४१.८६] | ६<br>[११.७६]<br>[२८.५७] | २<br>[३.९२]<br>[२५] | ९<br>[१७.६५]<br>[३९.१३] | ५१<br>[१००]<br>[४२.१५] |
| माध्यमिक | ८<br>[२३.५३]<br>[४०] | ३<br>[८.८२]<br>[२०] | १४<br>[४१.१८]<br>[३२.५६] | २<br>[५.८८]<br>[१६.६७] | ३<br>[८.८२]<br>[३७.५] | ४<br>[११.७६]<br>[१७.३९] | ३४<br>[१००]<br>[२८.१] |
| उच्च | १<br>[४.७६]<br>[५] | - | ४<br>[३३.३४]<br>[९.३] | १<br>[४.७६]<br>[४.७६] | - | ६<br>[२८.५७]<br>[२६.०९] | १२<br>[१००]<br>[९.९२] |
| एकूण .... | २०<br>[१६.५३]<br>[१००] | १५<br>[१२.४]<br>[१००] | ४३<br>[३५.५४]<br>[१००] | १२<br>[९.९२]<br>[१००] | ८<br>[६.६१]<br>[१००] | २३<br>[१९]<br>[१००] | १२१<br>[१००]<br>[१००] |

## तक्ता क्रमांक ६.४

### अनुभवकाळ निहाय कमिशन एजंटची गरज

| अनुभव काळ | शेती प्रक्रियेसाठी कर्ज व उचल देतो | साठवणूक सोय व शेतमालाचे संरक्षण | विनाविलंब विक्री करतो | विक्री उत्पन्नाची हमी व बाजार माहिती देतो | मागणी नसलेल्या मालाची विक्री करतो | कमिशन एजंटची गरज नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ पर्यंत | ४<br>[१५.३८]<br>[ २० ] | २<br>[ ७.६९]<br>[१३.३३] | ८<br>[३०.७७]<br>[१८.६०] | २<br>[ ७.६९]<br>[१६.६७] | ३<br>[११.५४]<br>[३७.५ ] | ७<br>[२६.९२]<br>[३०.४४] | २६<br>[ १०० ]<br>[२१.४९] |
| ६ ते १० | ३<br>[१६.६७]<br>[ १५ ] | २<br>[११.११]<br>[१३.३३] | ५<br>[२७.७८]<br>[११.६३] | १<br>[ ५.५५]<br>[ ८.३३] | २<br>[११.११]<br>[ २५ ] | ५<br>[२७.७८]<br>[२१.७४] | १८<br>[ १०० ]<br>[१४.८८] |
| ११ ते २० | ७<br>[२४.१४]<br>[ ३५ ] | ४<br>[१३.७९]<br>[२६.६७] | ११<br>[३७.९३]<br>[२५.५८] | ३<br>[१०.३४]<br>[ २५ ] | १<br>[ ३.४६]<br>[१२.५ ] | ३<br>[१०.३४]<br>[१३.०४] | २९<br>[ १०० ]<br>[२३.९७] |
| २० पेक्षा जास्त | ६<br>[१२.५ ]<br>[ ३० ] | ७<br>[१४.५८]<br>[४६.६७] | १९<br>[३९.५८]<br>[४४.१९] | ६<br>[१२.५ ]<br>[ ५० ] | २<br>[ ४.१७]<br>[ २५ ] | ८<br>[१६.६७]<br>[३४.७८] | ४८<br>[ १०० ]<br>[३९.६७] |
| एकूण .... | २०<br>[१६.५३]<br>[ १०० ] | १५<br>[१२.४ ]<br>[ १०० ] | ४३<br>[३५.५४]<br>[ १०० ] | १२<br>[ ९.९२]<br>[ १०० ] | ८<br>[ ६.६१]<br>[ १०० ] | २३<br>[ १९ ]<br>[ १०० ] | १२१<br>[ १०० ]<br>[ १०० ] |

## तक्ता क्रमांक ६.५

## वार्षिक उत्पन्नानिहाय कमिशन एजंटची गरज

| उत्पन्न रुपये | शेती प्रक्रियेसाठी कर्ज व उचल देतो | साठवणूक सोय व किमतीत संरक्षण | विनाविलंब विक्री करतो | विक्री उत्पन्नाची हमी व बाजार माहिती देतो | मागणी नसलेल्या मालाची विक्री करतो | कमिशन एजंटची गरज नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १,००० | २ | | ३ | | | १ | ६ |
| पर्यंत | [३७.५] | - | [५०] | - | - | [१२.५] | [१००] |
| | [१०] | | [३.९८] | - | - | [४.३५] | [४.९६] |
| १,००१ | ३ | ८ | १३ | ३ | ३ | ८ | ३८ |
| ते | [७.८९] | [२१.०६] | [३४.२२] | [७.८९] | [७.८९] | [२१.०५] | [१००] |
| ५,००० | [१५] | [५३.३३] | [३०.२३] | [२५] | [३७.५] | [३४.७८] | [३१.४] |
| ५,००१ | ७ | ३ | १२ | ६ | २ | ६ | ३६ |
| ते | [१९.४४] | [८.३३] | [३३.३३] | [१६.६७] | [५.५६] | [१६.६७] | [१००] |
| १०,००० | [३५] | [२०] | [२७.९१] | [५०] | [२५] | [२६.०९] | [२९.७५] |
| १०,००१ | १ | | ३ | | | २ | ६ |
| ते | [१६.६६] | - | [५०] | - | - | [३३.३४] | [१००] |
| १५,००० | [५] | | [६.९८] | | | [८.७०] | [४.९६] |
| १५,००१ | ४ | ३ | ६ | २ | २ | ३ | २० |
| ते | [२०] | [१५] | [३०] | [१०] | [१०] | [१५] | [१००] |
| २०,००० | [२०] | [२०] | [१३.९५] | [१६.६७] | [२५] | [१३.०४] | [१६.५३] |
| २०,००१ | २ | | २ | १ | | २ | ७ |
| ते | [२८.५७] | - | [२८.५७] | [१४.२९] | - | [२८.५७] | [१००] |
| २५,००० | [१०] | | [४.६५] | [८.३३] | | [८.७०] | [५.७९] |
| २५,००१ | १ | १ | २ | | १ | | ५ |
| ते | [२०] | [२०] | [४०] | - | [२०] | - | [१००] |
| ३०,००० | [५] | [६.६७] | [४.६५] | | [१२.५] | | [४.१३] |
| ३०,००१ | | | २ | | | १ | ३ |
| पेक्षा जास्त | - | - | [६६.६७] | - | - | [३३.३३] | [१००] |
| | | | [४.६५] | | | [४.३५] | [२.४८] |
| | २० | १५ | ४३ | १२ | ८ | २३ | १२१ |
| एकूण .... | [१६.५३] | [१२.४] | [३५.५४] | [९.९२] | [६.६१] | [१९.०१] | [१००] |
| | [१००] | [१००] | [१००] | [१००] | [१००] | [१००] | [१००] |

पसंतीचे कारण या मताला पुष्टीच देते.

६.४.३ <u>अनुभव काळ निहाय कमिशन एजंटची गरज :</u>

तक्ता क्रमांक ६.४ वरून शेती व्यवसायातील अनुभव काळातील वाढीबरोबर कमिशन एजंटची गरज काही प्रमाणात वाढत आहे असे शेतक-यांनी दिलेल्या उत्तरावरून दिसून येते. एजंट शेतमालाची त्वरीत विक्री करतो हे त्याचे महत्वाचे कारण होय. पण वीस वर्षांपर्यंतच्या अनुभव काळाच्या तीन गटातील शेतक-यांच्या मते कमिशन एजंट शेतमालाची त्वरीत विक्री करण्याबरोबर शेतमाल विक्रीपुर्वी कर्ज व उचल देतो हे दुसरे महत्वाचे कारण आहे. वीस वर्षावरील अनुभवकाळ असणारे शेतकरी मात्र कमिशन एजंटकडून शेतमालाच्या साठवणुकीसाठी मिळणा-या मदतीला जास्त महत्व देतात.

६.४.४ <u>वार्षिक उत्पन्न निहाय कमिशन एजंटची गरज :</u>

तक्ता क्रमांक ६.५ वरून असे दिसते की, १०,००१ ते १५,००० आणि ३०,००१ रुपयापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न गटात येणारे शेतकरी ३३.३३ इतक्या मतांनी कमिशन एजंटची गरज नाही असे सांगतात. १००० रुपयापर्यंत आणि ५००१ ते २५,००० रुपये या उत्पन्न गटातील लोकांना कमिशन एजंट उचल देतो हे तो प्रत्येक गांवात असण्यासाठी सबळ कारण वाटते. पण १,००१ ते ५,००० रुपये उत्पन्न गटातील शेतक-यांना साठवणुकीसाठी कमिशन एजंट देत असलेली सुविधा जास्त महत्वाची वाटते.

६.४.५ <u>धारणाक्षेत्र निहाय कमिशन एजंटची गरज :</u>

१.५१ हेक्टर ते २.५० हेक्टर आणि २.५१ ते ३.५० हेक्टर जमीनीचे धारणाक्षेत्र असणा-या शेतक-यांपैकी एक पंचमांश पेक्षा जास्त संख्येने शेतक-यांच्या दृष्टीने कमिशन एजंटची या क्षेत्रात गरज नाही. १.५१ हेक्टर

<u>तक्ता क्रमांक ६.६</u>

<u>पीक प्रकार निहाय कमिशन एजंटची गरज</u>

| पीक प्रकार | शेती प्रक्रियेसाठी कर्ज व उचल देतो | साठवणूक सोय व शेतमालास संरक्षण | विनाविलंब विक्री करतो | विक्री उत्पन्नाची हमी व बाजार माहिती देतो | मागणी नसलेल्या मालाची विक्री करतो | कमिशन एजंटची गरज नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९ | १४ | ४२ | १३ | ६ | १९ | ११३ |
| अन्नधान्ये | [१६.८१] | [१२.३९] | [३७.१७] | [११.५०] | [ ५.३१] | [१६.८१] | [ १०० ] |
| | [४२.२२] | [४६.६७] | [४७.१९] | [४८.१५] | [३५.२९] | [ ५० ] | [४५.९३] |
| | १७ | ११ | ३२ | ११ | ७ | १४ | ९२ |
| नगदी | [१८.४८] | [११.९६] | [३४.७८] | [११.९६] | [ ७.६०] | [१५.२२] | [ १०० ] |
| | [३७.७८] | [३६.६७] | [३५.९६] | [४०.७४] | [४१.१८] | [३६.८४] | [३७.४ ] |
| | ७ | ३ | १० | ३ | ३ | ४ | ३० |
| भाजीपाल | [२३.३४] | [ १० ] | [३३.३३] | [ १० ] | [ १० ] | [१३.३३] | [ १०० ] |
| | [१५.५६] | [ १० ] | [११.२३] | [११.११] | [१७.६५] | [१०.५३] | [१२.२ ] |
| | २ | २ | ५ | | १ | १ | ११ |
| फळे | [१८.१८] | [१८.१८] | [४५.४६] | - | [ ९.०९] | [ ९.०९] | [ १०० ] |
| | [ ४.४४] | [ ६.६६] | [ ५.६२] | | [ ५.८८] | [ २.६३] | [ ४.४७] |
| | ४५ | ३० | ८९ | २७ | १७ | ३ | २४६ |
| एकूण .... | [१८.२९] | [ १२.२ ] | [३६.१८] | [१०.९८] | [ ६.९१] | [१५.४५] | [ १०० ] |
| | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] |

ते २.५० हेक्टर आणि ३.५१ ते ४.५० हेक्टर धारणाक्षेत्र असणाऱ्या गटातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने कमिशन एजंट शेतमालाची करीत असलेली संरक्षित साठवणूक हे दुसऱ्या क्रमांकाचे कमिशन एजंटच्या अस्तित्वाचे महत्वाचे कारण वाटते. ६.५१ हेक्टर ते ७.५० हेक्टर धारणा क्षेत्र असणाऱ्यांना मशागतीसाठी उपलब्ध होणारे कर्ज, साठवणूक सोय, विना विलंब शेतमाल विक्री व विक्री उत्पन्नाची हमी ही कमिशन एजंटची कार्ये सारख्याच महत्वाची वाटतात. सर्व शेतकऱ्यांच्या मते कमिशन एजंट शेतमालाची विनाविलंब विक्री करतो म्हणून त्याचे अस्तित्व जरूरीचे ठरते.

### ६.४.६ <u>पीक प्रकार निहाय कमिशन एजंटची गरज :</u>

तक्ता क्रमांक ६.६ वरून नगदी पीके व अन्नधान्ये पिकविणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा फळे व भाजीपाला पिकविणारे शेतकरी जास्त प्रमाणात कमिशन एजंटवर अवलंबून असलेले दिसतात. फळे व भाजीपाला नाशवंत आहे हे कदाचित त्याचे कारण असावे. कमिशन एजंट शेतमालाची ताबडतोब विक्री करून देतो हे सर्व शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचे कारण आहे. फळे पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने त्या बालोबाल तो उचल देतो आणि शेतमालाची साठवणूक करतो ही सारख्याच महत्वाची दुसऱ्या क्रमांकाची कारणे होत. तर इतर शेतकऱ्यांच्या मते कमिशन एजंट उचल देतो हेच त्याच्या अस्तित्वासाठी दुसऱ्या क्रमांकाचे कारण आहे.

### ६.५ <u>बाजारातील व्यापाऱ्यांचा दुराचार :</u>

शेतमालाच्या विक्रीत व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची अनेक प्रकारे फसवणूक होत असते. कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापन होऊनही हे होतच राहिले आहे हे विशेष. छपन्न [८७.४२ टक्के] कृषकांच्या मते व्यापाऱ्यांचा

आजही हा दुराचार चालला आहे. तुंगत, रोपळे, करंकब, मंडीशेगांव या गावातील लोकांना इतर गावातील शेतक-यांच्या मानाने आपली व्यापा-यांकडून फसवणूक जास्त प्रमाणात होते असे वाटते. अडतीस [४७.५० टक्के] शेतक-यांच्या मते त्यांच्यासारख्या प्रतीच्या शेतमालास व्यापारी वेगवेगळी किंमत देतात. तर ३६ [४५ टक्के] शेतक-यांच्या मते व्यापारी शेतमालाची खरेदी करताना न परवडणारे चार्जेस आकारतात. कृषि उत्पन्न बाजारपेठेतील व्यापारी शेतमाल विकत घेताना धर्मादाय व व्यापारी संघाच्या हितासाठी लहरी रक्कम वजावट करतात असे मत २८ [३५ टक्के] शेतक-यांनी नोंदविले. शेतक-यानि बाजारपेठेत आणलेला शेतमाल हलका आहे असा खोटा आरोप करुन व्यापारी लहरीप्रमाणे हवी ती रक्कम वजावट करतात अशी सव्वीस [३२.५० टक्के] शेतक-यांची धारणा आहे. एकोणीस [२३.७५ टक्के] कृषकांच्यामते व्यापारी नमुन्यासाठी जास्त प्रमाणात माल काढतात. व्यापारी शेतमालाच्या तोलाईसाठी वापरत असलेली वजन-मापे विश्वासार्ह नसतात असा १२ [१५ टक्के] शेतक-यांचा संशय आहे. आठ [१० टक्के] शेतक-यांच्या मते व्यापारी शेतमालाच्या प्रक्रीयेवर मर्यादा घालतात. व्यापा-यांच्या या दुराचारामुळे होणा-या व्यथा शेतक-यांनी अशाप्रकारे कथित केल्या.

अशा दुराचारापासुन नियंत्रीत बाजार मुक्त करण्यासाठी बाजार समितीच्या पर्यवेक्षक व कर्मचा-यांनी प्रभावी पाऊले उचलली पाहिजेत

## ६.५.१ <u>बाजारातील व्यापा-यांचा दुराचाराचे शिक्षण निहाय विश्लेषण :</u>

तक्ता क्रमांक ६.७ नुसार सर्व शैक्षणिक स्तरातील शेतक-यांनी सर्व दुराचाराबाबत मत प्रकट केले आहे. त्यातही प्राथमिक पातळीवरील शिक्षण घेतलेल्या व निरक्षर शेतक-यांना व्यापा-याचे असे वागणे जास्त प्रमाणात आक्षेपार्ह

वाटते. सर्व शैक्षणिक गटातील शेतक-यांनी न परवडणारे वार्जेस अकारणे [१२ ते २२ टक्के] व सारख्या प्रतीच्या शेतमालात वेगवेगळी किंमत देणे [१४ ते ३२ टक्के] या व्यापा-यांच्या दोन प्रकारच्या दुराचारात बाधा फोडली आहे.

६.५.२ दुराचाराचे व्यवसाय निहाय विश्लेषण :

तक्ता क्रमांक ६.८ नुसार शेती व्यवसाय हा एकमेव व्यवसाय असणा-यापैकी १९ शेतक-यांना व्यापा-यांच्या व्यवहाराबद्दल कोणतीच आशंका नाही. इतर व्यवसाय करणा-यापैकी पाच शेतक-यांची ही परिस्थिती आहे. पण मुख्यत्वे मजूरी करणा-या सर्व शेतक-यांना व्यापा-यांचे वागणे खटकते. व्यापा-यांच्या वर्तनाबद्दल तक्रार करणा-यापैकी २९ [७६.३२ टक्के] शेतक-यांना सारख्या प्रतीच्या शेतमालाला व्यापारी वेगवेगळी किंमत देतो असे वाटते. तर २८ [१७.९५ टक्के] शेतक-यांना व्यापारी न परवडणारे वार्जेस लावतो असे वाटते. म्हणजे शेती हा एकमेव व्यवसाय असणा-या शेतक-यांच्या व्यापा-यांबद्दलच्या या प्रमुख तक्रारी आहेत. मजूरी करणा-या शेतक-यांच्या मते या दोनच प्रमुख तक्रारी-पण विरूद्ध अनुक्रमाने आहेत. इतर व्यवसाय करणारे शेतकरी फक्त शेती व्यवसाय करणा-यां बरोबर आहेत.

६.५.३ बाजारातील व्यापा-यांचा दुराचाराचे अनुभवकाळ निहाय विवेचन :

तक्ता क्रमांक ६.९ वरून पाच वर्षापेक्षा कमी अनुभव काळ असणा-या शेतक-यांपासून ११-२० वर्षे अनुभव काळ असणा-या शेतक-यांच्या गटांना व्यापारी कमी प्रमाणात दुराचार करतात असे घटत्या प्रमाणात वाटते. तर २० वर्षापेक्षा जास्त अनुभव असणा-या शेतक-यांना जास्त संख्येने असे वाटते की, व्यापारी आपली फसवणूक करीत असतो. पाच वर्षापर्यंत अनुभव असणा-या व २० वर्षापेक्षा जास्त काळ अनुभव असणा-या शेतक-यांना सारख्या प्रतीच्या शेतमालात व्यापारी

वेगवेगळी किंमत देतो. हा प्रमुख दोष वाटतो तर ६ ते २० वर्षे अनुभव काळ असणा-या शेतक-यांना, व्यापारी शेतमाल विकत घेताना न परवडणारे चार्जेस आकारतो असे प्रामुख्याने वाटते. वीस वर्षां पर्यंतच्या अनुभव असणा-या तीन गटातील शेतक-यांना व्यापारी धर्मादाय व व्यापारी संस्थासाठी लहरीला येईल तशी शेतमालाच्या किंमतीतून रक्कम कापतो असे वाटते पण २० वर्षापेक्षा जास्त अनुभव काळ असणा-या शेतक-यांचा दोन क्रमांकाचा आरोप व्यापारी न परवडणारे चार्जेस आकारतो असा आहे.

६.५.४ बाजारातील व्यापा-यांच्या दुराचाराचे वार्षिक उत्पन्नाच्या संदर्भात विश्लेषण :

तक्ता क्रमांक ६.१० वरून १०,००१ ते १५,००० व २०,००१ ते २५,००० रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या सर्व शेतक-यांना शेतमाल विकत घेताना आपले शोषण करतो असे वाटते. ३०,००१ रुपयापेक्षा जास्त उत्पन्न असणा-या सर्व शेतक-यांना व्यापारी कोणताच दुराचार करीत नाही असे वाटते. १,००१ रुपयांपर्यंत आणि २५,००१ ते ३०,००० रुपये उत्पन्न गटातील बहुसंख्य शेतक-यांना व्यापा-यांकडून आपली फसवणूक होते असे वाटते. १,००१ ते १०,००० रुपये वार्षिक उत्पन्न असणारे शेतकरी वगळता इतर उत्पन्न गटातील शेतक-यांना सर्वच प्रकाराने आपली फसवणूक केली जाते असे वाटते. मात्र १,००१ ते ५,००० रुपये उत्पन्न गटातील शेतकरी, सारख्या प्रतीच्या शेतमालालाही वेगवेगळी किंमत लावली जाते आणि व्यापारी न परवडणारे चार्जेस आकारतो असे व्यापा-यांविरुध्द मत प्रदर्शित करतात. ५,००१ ते १०,००० रुपये उत्पन्न गटातील शेतकरी हेच दोन आरोप पण विरुध्द प्राधान्यक्रमाने व्यापा-या विरुध्द करतात.

६.५.५ व्यापाऱ्यांचा दुराचाराचे धारणाक्षेत्र निहाय विवेचन :

९.५१ ते १०.५० हेक्टर धारणाक्षेत्र असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांच्या वर्तणुकी विरुद्ध आपले मत नोंदविले आहे. तर अर्धा हेक्टर पर्यंत धारणाक्षेत्र असणाऱ्यापैकी निम्म्या शेतकऱ्यांना आणि १.५१ ते २.५० हेक्टर शेती असणाऱ्या १५ पैकी ६ [४० टक्के] लोकांना तसेच ४.५१ ते ५.५० हेक्टर जमीन असणाऱ्या ८ पैकी ४ शेतकऱ्यांना व्यापारी कोणताही दुराचार करीत नाही असे वाटते.

अर्धा हेक्टर पासून ६.५० हेक्टर पर्यंत शेती असणाऱ्यांनी व्यापारी सर्व प्रकारे आमचे शोषण करतो असे सांगितले. १.५१ ते ३.५० हेक्टर पर्यंत जमीन असणारे शेतकरी सारख्या प्रतीच्या शेतमालास व्यापारी लहरीप्रमाणे वेगवेगळी किंमत लावतो हे प्राधान्य क्रमाने सांगितले. तर अर्धा हेक्टर ते १.५० हेक्टर, व ३.५१ ते ४.५० हेक्टर धारणाक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या मते या गोष्टीचा क्रमांक व्यापारी न परवडणारे वार्जेस आकारतो या गोष्टीच्या खालोखाल होता.

६.५.६ व्यापाऱ्यांच्या दुराचाराचे पीक प्रकाराप्रमाणे विवेचन :

तक्ता क्र. ६.११ वरुन अन्नधान्य व नगदी पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी मुख्यत्वे "न परवडणारे वार्जेस" व सारख्या प्रतीच्या शेतमालास वेगवेगळी किंमत या दोन दुराचारांचा निर्देश मोठ्या संख्येने केला. भाजीपाला घेणाऱ्या शेतकऱ्यांनी सारख्या प्रतीच्या शेतमालासाठी वेगवेगळी किंमत, न परवडणारे वार्जेस आणि धर्मादाय व व्यापारी हितासाठी लहरी रक्कम कपात या दुराचाराचा विशेष उल्लेख केला. फळे पिकविणाऱ्या आठ शेतकऱ्यांपैकी तीन [३७.५ टक्के] शेतकऱ्यांनी सारख्या प्रतीच्या शेतमालास वेगवेगळी किंमत दिली जाते हा दुराचार प्रामुख्याने सांगितला. व्यापाऱ्यांमार्फत दुराचार होत नाही म्हणणाऱ्यांपैकी ३०.७६ टक्के अन्नधान्य, ३२.२५ टक्के नगदी, ३१.८२टक्के भाजीपाला, २५ टक्के फळे, पिकविणारे शेतकरी आहेत.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| निरक्षर | ७ [२१.८८] [१८.४२] | ७ [२१.८८] [१९.४५] | ३ [९.३८] [१०.७१] | ५ [१५.६३] [१९.२३] | ४ [१२.५] [२१.०५] | १ [३.१३] [८.३४] | १ [३.१३] [१२.५] | ४ [१२.५] [१६.६७] | ३२ [१००] [१६.७५] |
| प्राथमिक | १० [१४.४९] [२६.३२] | १५ [२१.७४] [४१.६७] | १३ [१८.८४] [४६.४३] | १० [१४.४९] [३८.४६] | ५ [७.२५] [२६.३२] | ५ [७.२५] [४१.६७] | ४ [५.८] [५०] | ७ [१०.१४] [२९.१७] | ६९ [१००] [३६.१३] |
| माध्यमिक | १२ [२०] [३१.५८] | ८ [१३.३४] [२२.२३] | ८ [१३.३४] [२८.५७] | ८ [१३.३४] [३०.७७] | ९ [१५] [४७.३७] | ४ [६.६७] [३३.३३] | २ [३.३४] [२५] | ९ [१५] [३७.५] | ६० [१००] [३१.४१] |
| उच्च | ९ [३०] [२३.६८] | ६ [२०] [१६.६७] | ४ [१३.३४] [१४.२९] | ३ [१०] [११.५४] | १ [३.३४] [५.२६] | २ [६.६७] [१६.६७] | १ [३.३४] [१२.५] | ४ [१३.३४] [१६.६७] | ३० [१००] [१५.७१] |
| एकूण ... | ३८ [१९.९] [१००] | ३६ [१८.८५] [१००] | २८ [१४.६६] [१००] | २६ [१३.६१] [१००] | १९ [९.९५] [१००] | १२ [६.२८] [१००] | ८ [४.१९] [१००] | २४ [१२.५७] [१००] | १९१ [१००] [१००] |

## तक्ता क्रमांक ६.८

### बाजारातील व्यापा-यांचा दुराचाराचे व्यवसायानुसार पृथक्करण

| व्यवसाय | बारदाना पुरविल्या शेतीमालास विविध किंमत देतात | न परवडणारे वार्षिक आकारतात | धर्मादाय व व्यापारी संघाच्या हितासाठी लहरी रक्कम कपात करतात | हलक्या प्रतीचा माल असा खोटा आरोप करून लहरी रक्कम कपात करतात | नमुन्यासाठी जास्त प्रमाणात शेतमाल घेतात | अविश्वासार्ह मापे/काटे | व्यापारी प्रक्रियेवर मर्यादा घालतात | काहीही प्रश्न नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शेती | २९ [१८.५९] [७६.३२] | २८ [१७.९५] [७७.७८] | २४ [१५.३८] [८५.७१] | २२ [१४.१०] [८४.६२] | १७ [१०.९०] [८९.४७] | १० [६.४१] [८३.३३] | ७ [४.४९] [८७.५] | १९ [१२.१८] [७९.१७] | १५६ [१००] [८१.६८] |
| मजुरी व शेती | २ [२५] [५.२६] | ३ [३७.५] [८.३३] | १ [१२.५] [३.५७] | १ [१२.५] [३.८५] | १ [१२.५] [५.२६] | - | - | - | ८ [१००] [४.१९] |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इतर व्यवसाय व शेती | [२५.९३] | | [१९.५७] | | [११.११] | | [११.११] | [३.७०] | [७.४१] | [३.७] | [१८.५१] | [१००] |
| | [१८.४२] | | [१३.८२] | | [१०.७१] | | [११.५४] | [५.२६] | [१६.६७] | [१२.५] | [२०.८३] | [१४.१४] |
| | २८ | | ३६ | | २८ | | २६ | १९ | १२ | ८ | २४ | १९१ |
| एकूण .... | [१९.९] | [१००] | [१८.८५] | [१००] | [१४.६६] | [१००] | [१३.६१] [१००] | [९.९५] [१००] | [६.२८] [१००] | [४.१९] [१००] | [१२.५७] [१००] | [१००] [१००] |



## तक्ता क्रमांक ६.७

### व्यापाऱ्यांच्या दुराचाराचे शिक्षणनिहाय पृथक्करण

| शिक्षण | तारखा प्रतीच्या शिमातास विविध किंमत | न पुरवणारे वार्जेस आकारतात | धर्मादाय, व्यापारी सं. हितासाठी लहरी कपात | हलका माल असा आरोप करून कपात | नमुन्यासाठी जास्त प्रमाण | अधिवातासाठी मापे/वजन | व्यापारी प्रक्रियेवर मर्यादा घालतात | काहीही प्रश्न नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

## तक्ता क्रमांक ६.११

## बाजारातील व्यापाऱ्यांच्या दराबाबत पीक प्रकार निहाय पृथक्करण

| पीक प्रकार | सारख्या शेतमालास विविध किंमत | न परवडणारे वार्षिक आकारतात | धर्मादाय, व्यापारी संघाच्या हिता साठी नाहीं कपात | हलका माल असा आरोप करून कपात | नमुन्यासाठी जास्त प्रमाण | अविश्वासार्ह मापे/वजने | व्यापारी प्रक्रियेवर मर्यादा घालतात | काहीही प्रश्न नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३२ | ३४ | २६ | २३ | १८ | १२ | ७ | २४ | १७६ |
| अन्नधान्ये | [१८.१८] | [१९.३२] | [१४.७७] | [१३.०७] | [१०.२३] | [ ६.८२] | [ ३.९८] | [१३.६४] | [ १०० ] |
| | [४६.३८] | [५०.७५] | [४९.०६] | [४७.९२] | [ ५० ] | [ ६० ] | [३८.८९] | [४५.२८] | [४८.३५] |
| | २६ | २६ | १९ | २३ | १३ | ५ | ६ | २० | १३८ |
| नागदी | [१८.८४] | [१८.८४] | [१३.७७] | [१६.६७] | [ ९.४२] | [ ३.६२] | [ ४.३५] | [१४.४९] | [ १०० ] |
| | [३७.६८] | [३८.८१] | [३५.८५] | [४७.९२] | [३६.११] | [ २५ ] | [३३.३३] | [३७.७४] | [३७.९१] |
| | ८ | ६ | ६ | २ | ४ | ३ | ४ | ७ | ४० |
| भाजीपाला | [ २० ] | [ १५ ] | [ १५ ] | [ ५ ] | [ १० ] | [ ७.५ ] | [ १० ] | [१७.५ ] | [ १०० ] |
| | [११.५९] | [ ८.९५] | [११.३२] | [ ४.१६] | [११.११] | [ १५ ] | [२२.२२] | [१३.२१] | [ २.७५] |
| | ३ | १ | २ | – | १ | | १ | २ | १० |
| फळे | [ ३० ] | [ १० ] | [ २० ] | [ – ] | [ १० ] | [ – ] | [ १० ] | [ २० ] | [ १०० ] |
| | [ ४.३५] | [ १.४९] | [ ३.७७] | | [ २.७८] | | [ ५.५६] | [ ३.७७] | [१०.९९] |
| | ६९ | ६७ | ५३ | ४८ | ३६ | २० | १८ | ५३ | ३६४ |
| एकूण .... | [१८.९६] | [१८.४१] | [१४.५६] | [१३.१९] | [ ९.८९] | [ ५.४९] | [ ४.९५] | [१४.५६] | [ १०० ] |
| | | | | | | | | | [ १०० ] |

६.६ व्यापा-यांचा दुराचार दूर करण्यासाठी सूचना :

बाजार आवारातील व्यापा-यांचा दुराचार दूर करण्यासाठी १० टक्के शेतक-यांनी कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी करावी ही सूचना केली. तीन टक्के शेतक-यांनी मक्तेदारी योजनांचा अवलंब करावा असे म्हटले. तर ६.२५ टक्के शेतक-यांनी कोणतीही प्रतिक्रीया प्रकट करण्यास नकार दिला. बहुतांशी कृषकांनी केलेली सूचना अमलात आणल्यास व्यापा-यांचा दुराचार कमी होण्याची शक्यता जास्त आहे.

६.६.१ दुराचार निर्मूलनासाठी शिक्षण निहाय सूचना :

तक्ता क्रमांक ६.१२ वरून माध्यमिक शिक्षण घेतलेल्या शेतक-यांपैकी १५.६५ टक्के लोकांनी, प्राथमिक स्तरावरील शिक्षण झालेल्यांपैकी १३.७५ टक्के शेतक-यांनी, उच्च शिक्षितांपैकी १० टक्क्यांनी आणि निरक्षरांपैकी ७३.३४ टक्के शेतक-यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती कायद्याची पूर्णपणे अंमलबजावणी करावी असे मत मांडले. कांहीही मत प्रदर्शित न करणा-यांपैकी ६० टक्के शेतकरी निरक्षर आहेत. तर उच्च शिक्षितांमध्ये एकही शेतकरी नाही. माध्यमिक शिक्षितांचा अपवाद सोडता इतर शैक्षणिक स्तरावर मक्तेदारी योजनांची अंमलबजावणी ही सूचना शेतक-यांनी समान संख्येने मांडली.

६.६.२ दुराचार निर्मूलनासाठी आलेल्या सूचनांचा व्यवसाय निहाय विचार :

कृषि उत्पन्न बाजार समिती कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी करावी असे मत मजूरी करणा-या सर्व शेतक-यांनी व इतर व्यवसाय करणा-यांपैकी १३.३४ टक्के शेतक-यांनी व फक्त शेती व्यवसाय करणा-यांपैकी ८८.७१ टक्के लोकांनी मांडले. शेती करणा-यांपैकी २ (३.२३ टक्के) व इतर व्यवसाय करणा-यांपैकी १ (६.६७ टक्के) शेतक-यांनी त्याच बरोबर मक्तेदारी योजनांची अंमलबजावणी करावी असेही मत नोंदविले.

## तक्ता क्रमांक ६.१२

## दुराचार निर्मूलनासाठी सूचना शिक्षणनिहाय पृथक्करण

| शिक्षण | कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी | मजेदारी मिळण्याजोग्या योजनांची अंमलबजावणी | काहिही मत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| | ११ | १ | ३ | १५ |
| निरक्षर | [७३.३४] | [ ६.६७] | [ २० ] | [ १०० ] |
| | [१५.२८] | [३३.३३] | [ ६० ] | [१८.७५] |
| | ३० | १ | १ | ३२ |
| प्राथमिक | [९३.७५] | [ ३.१३] | [ ३.१३] | [ १०० ] |
| | [४१.६७] | [३३.३३] | [ २० ] | [ ४० ] |
| | २२ | | १ | २३ |
| माध्यमिक | [९५.६५] | – | [ ४.३५] | [ १०० ] |
| | [३०.५६] | | [ २० ] | [२८.७५] |
| | ९ | १ | | १० |
| उच्च | [ ९० ] | [ १० ] | [ – ] | [ १०० ] |
| | [१२.५ ] | [३३.३३] | | [१२.५ ] |
| | ७२ | ३ | ५ | ८० |
| एकूण .... | [ ९० ] | [ ३.७५] | [ ६.२५ ] | [ १०० ] |
| | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] |

६.६.२ <u>दुराचार दूर करण्यासाठी केलेल्या सूचनांचे अनुभवकाळ निहाय विवेचन :</u>

तक्ता क्रमांक ६.१२ वरून असे दिसते की, मत प्रदर्शित करणा-यांपैकी ६ ते २० वर्षे शेतकरी म्हणून अनुभव असणा-या १०० टक्के शेतक-यांनी कायद्याची पूर्णपणे अंमलबजावणी करावी हा एकच मार्ग [illegible]-यांचा दुराचार मोडून काढण्यासाठी सुचविला. पाच वर्षांपर्यंत अनुभव असणा-या सर्वांनी दुराचार दूर

करण्यासाठी आपली मते मांडली. त्यात १६[९४.१२ टक्के] शेतक-यांनी कायद्याची पूर्ण अंमलबजावणी व १[५.८८ टक्के] शेतक-याने मक्तेदारी निर्माण करणे हे मार्ग सुचविले.

## तक्ता क्रमांक ६.१३

## अनुभवकाळ निहाय दुराचार दूर करण्यासाठी केलेल्या सूचना

| अनुभव वर्षे | कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी | मक्तेदारी मिळण्या जोग्या योजनाची अंमलबजावणी | काहिही मत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५ पर्यंत | १६ [९४.१२] [२२.२२] | १ [५.८८] [३३.३३] | - | १७ [१००] [२१.२५] |
| ६ ते १० | १२ [९२.३१] [१६.६७] | [ - ] | १ [७.६९] [२०] | १३ [१००] [१६.२५] |
| ११ ते २० | १४ [८७.५] [१९.४४] | [ - ] | २ [१२.५] [४०] | १६ [१००] [२०] |
| २० पेक्षा जास्त | ३० [८८.२४] [४१.६७] | २ [५.८८] [६६.६७] | २ [५.८८] [४०] | ३४ [१००] [४२.५] |
| एकूण... | ७२ [९०] [१००] | ३ [३.७५] [१००] | ५ [६.२५] [१००] | ८० [१००] [१००] |

## तक्ता क्रमांक ६.१४

## उत्पन्न निहाय दुराचार दूर करण्यासाठी सूचना

| उत्पन्न रुपये | कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी | मक्तेदारी मिळण्या-जोगी योजनांची अंमलबजावणी | काहिही मत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १,००० पर्यंत | ४ [ १०० ] [ ५.५६ ] | – | – | ४ [ १०० ] [ ५ ] |
| १,००१ ते ५,००० | २३ [ ९२ ] [ ३१.९४ ] | १ [ ४ ] [ ३३.३३ ] | १ [ ४ ] [ २० ] | २५ [ १०० ] [ ३१.२५ ] |
| ५,००१ ते १०,००० | २१ [ ९१.३० ] [ २९.१७ ] | – | २ [ ८.७० ] [ ४० ] | २३ [ १०० ] [ २८.७५ ] |
| १०,००१ ते १५,००० | ५ [ १०० ] [ ६.९४ ] | – | – | ५ [ १०० ] [ ६.२५ ] |
| १५,००१ ते २०,००० | ११ [ ९१.६७ ] [ १५.२८ ] | – | १ [ ८.३३ ] [ २० ] | १२ [ १०० ] [ १५ ] |
| २०,००१ ते २५,००० | ५ [ १०० ] [ ६.९४ ] | – | – | ५ [ १०० ] [ ६.२५ ] |
| २५,००१ ते ३०,००० | १ [ ३३.३३ ] [ १.३९ ] | २ [ ६६.६७ ] [ ६६.६७ ] | – | ३ [ १०० ] [ ३.७५ ] |
| ३०,००१ पेक्षा जास्त | २ [ ६६.६७ ] [ २.७८ ] | – | १ [ ३३.३३ ] [ २० ] | ३ [ १०० ] [ ३.७५ ] |
| एकूण | ७२ [ ९० ] [ १०० ] | ३ [ ३.७५ ] [ १०० ] | ५ [ ६.२५ ] [ १०० ] | ८० [ १०० ] [ १०० ] |

## ५.६.४ दुराचार निर्मूलनासाठीच्या सूचनांचा उत्पन्ननिहाय विचार :

तक्ता क्रमांक ५.१४ नुसार १,००० रुपयापर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे सर्व शेतकरी तसेच १०,००१ ते १५,००० आणि २०,००१ ते २५,००० हजार उत्पन्न गटातील सर्व शेतकरी व्यापाऱ्यांचा दुराचार दूर झाला पाहिजे असे मत मांडतात व त्यासाठी कायद्याची पूर्ण अंमलबजावणी हा एकमेव उपाय सुचवितात. ५,००१ ते १०,००० रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांपैकी २१ (९१.३० टक्के) १५,००१ ते २०,००० रुपये उत्पन्न असणाऱ्यांपैकी ११ (९१.६७ टक्के) शेतकरी आणि २०,००१ रुपयापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांपैकी दोन शेतकरी (६६.६७ टक्के) मत प्रदर्शित करतात व त्यांचेही म्हणणे हेच आहे.

## ५.६.५ दुराचार निर्मूलन सूचनांचा धारणाक्षेत्र निहाय विचार :

साडेतीन हेक्टर पर्यंत आणि ७.५१ हेक्टर पेक्षा जास्त धारणाक्षेत्र असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांचा दुराचार दूर करण्याबद्दल आपले मत नोंदविले व त्यापैकी १०.५१ हेक्टर पेक्षा जास्त धारणा क्षेत्र असणारे शेतकरी वगळता यापैकी इतर धारणाक्षेत्र गटातील सर्व शेतकऱ्यांच्या मते त्यासाठी कायद्याची पूर्ण अंमलबजावणी हा एकमेव मार्ग आहे. ५.५१ ते ७.५० हेक्टर धारणाक्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांपैकी मते नोंदविणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचेही मत असेच आहे. ३.५१ ते ४.५०, ४.५१ ते ५.५० व १० हेक्टर पेक्षा जास्त धारणा क्षेत्र असणाऱ्या तीन गटातील शेतकऱ्यांपैकी प्रत्येकी एकाचे मत मक्तेदारी मिळण्याजोगी योजना अमलात आणून व्यापाऱ्यांचा दुराचार रोखता येईल असे आहे.

## ५.६.६ दुराचार निर्मूलन सूचनांचा पीक प्रकारानुसार विश्लेषण :

व्यापाऱ्याकडून होणारे शोषण नष्ट करण्यासाठी पके पिकविणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती कायद्याची पूर्ण अंमलबजावणी करावी असा प्रस्ताव मांडला. नगदी पीके घेणाऱ्या शेतकऱ्यांपैकी ९१.९४ टक्के,

भाजीपाला पिकविणा-यांपैकी १०.९० टक्के आणि अन्नधान्ये पिकविणा-या शेतक-यांपैकी ८९.७४ टक्के लोक या ठरावाच्या बाजूने होते. मक्तेदारी मिळण्याजोग्या योजनेची अंमलबजावणी करून व्यापा-यांकडून होणारे शोषण थांबविता येईल असे फक्त नगदी [४.८४ टक्के] व अन्नधान्ये [३.८५ टक्के] शेतक-यांना वाटत होते.

६.७ बाजार फी ची निश्चितता :

कृषि उत्पन्न बाजार समिती मार्केट यार्ड मध्ये येणा-या शेतक-यांकडून व्यवहाराबाबत फी आकारली जाते. ह्या फी आकारणीबद्दल शेतक-यांची मते अजमावली असता ४३ [५३.७५ टक्के] शेतक-यांनी ही फी कायद्याप्रमाणेच आकारली जाते असे सांगितले तर १७ [२१.२५ टक्के] शेतक-यांच्यामते मार्केटयार्ड कायद्यापेक्षा जास्त फी आकारते. वीस [२५ टक्के] शेतक-यांना कोणतेच निश्चित उत्तर देता आले नाही.

६.७.१ शिक्षण निहाय बाजार फी ची निश्चितता :

तक्ता क्रमांक ६.१५ वरून माध्यमिक व उच्च शिक्षण झालेले शेतकरी जास्त प्रमाणात मार्केट यार्ड कडून आकारल्या जाणा-या फी बद्दल निश्चित उत्तर देऊ शकले नाहीत हे विशेष होय. तसे अशिक्षितांपैकी वीस टक्क्यांनाही उत्तर देता आले नाही. पण ते अशिक्षित आहेत ही सबब तरी सांगता येते. यावरून आपल्याशी निगडीत असलेल्या गोष्टींबद्दल सुशिक्षित शेतकरीही किती अनभिज्ञ आणि उदास आहेत हे दिसून येते. सर्व शिक्षण गटातील साधारणपणे ५० ते ५५ टक्के शेतक-यांनी कायद्याने ठरवून दिल्या इतकीच फी मार्केट यार्ड मध्ये घेतली जाते असे मत नोंदविले.

६.७.२ व्यवसाय निहाय बाजार फी मधील निश्चितता :

तक्ता क्रमांक ६.१६ वरून असे दिसते की, शेतीव्यवसाय करणारे ५० टक्के, मजूरी व इतर व्यवसाय करणारे प्रत्येकी ६६.६७ टक्के शेतक-यांच्या मते

बाजार फी कायद्याप्रमाणे घेतात. कायद्यातील तरतुदीपेक्षा जास्त बाजार फी घेतात म्हणणारे शेती [२५.८१ टक्के] व इतर [६.६७ टक्के] व्यवसाय करणारे शेतकरी आहेत. एकूण शेतक-यांपैकी २० [२५ टक्के] शेतक-यांनी बाजार फी अनिश्चित स्वरूपाने वसूल केली जाते असे सांगितले.

तक्ता क्रमांक ६.१५

शिक्षणनिहाय बाजार फी ची निश्चितता

| शिक्षण | बाजार फी कायद्याप्रमाणे घेतात. | बाजार फी कायद्यापेक्षा जास्त घेतात. | बाजार फी अनिश्चित घेतात. | एकूण |
|---|---|---|---|---|
| निरक्षर | ८ [५३.३३] [१८.२९] | ४ [२६.६७] [२३.५३] | ३ [२०] [१५] | १५ [१००] [१८.७५] |
| प्राथमिक | १८ [५६.२५] [४१.१४] | ८ [२५] [४७.०६] | ६ [१८.७५] [३०] | ३२ [१००] [४०] |
| माध्यमिक | १२ [५२.१७] [२७.४३] | ३ [१३.०४] [१७.६४] | ८ [३४.७८] [४०] | २३ [१००] [२८.७५] |
| उच्च | ५ [५०] [११.४३] | २ [२०] [११.७६] | ३ [३०] [१५] | १० [१००] [१२.५] |
| एकूण .. | ४३ [५३.७५] [१००] | १७ [२१.२५] [१००] | २० [२५] [१००] | ८० [१००] [१००] |

तक्ता क्रमांक ६.१६

व्यवसायनिहाय बाजार फी ची निश्चितता

| व्यवसाय | कायद्याप्रमाणे बाजार फी घेतात | कायद्यातील तरतुदीपेक्षा जास्त बाजार फी घेतात | बाजार फी अनिश्चित घेतात | एकूण |
|---|---|---|---|---|
| शेती | ३१ [५०] [७२.०९] | १६ [२५.८१] [९४.१२] | १५ [२४.१९] [७५] | ६२ [१००] [७७.५] |
| मजूर व शेती | २ [६६.६७] [४.६५] | - | १ [३३.३३] [५] | ३ [१००] [३.७५] |
| इतर व्यवसाय व शेती | १० [६६.६७] [२३.२६] | १ [६.६७] [५.८८] | ४ [२६.६७] [२०] | १५ [१००] [१८.७५] |
| एकूण | ४३ [५३.७५] [१००] | १७ [२१.२५] [१००] | २० [२५] [१००] | ८० [१००] [१००] |

### ६.७.३ अनुभव कालानुसार बाजार फी मधील निश्चितता :

तक्ता क्रमांक ६.१७ वरून सहा ते दहा वर्ष अनुभव असणा-या शेतक-यांपैकी ३८.४६ टक्के, ५ वर्षापेक्षा कमी अनुभव असणा-यांपैकी २९.४१ टक्के आणि २० वर्षापेक्षा जास्तकाळ शेती करणा-यांपैकी २०.५९ टक्के शेतक-यांना मार्केट यार्डमध्ये फी कायद्याप्रमाणे घेतली जाते की जास्त घेतली जाते हे निश्चितपणे सांगता आले नाही. ११ ते २० वर्ष अनुभव गटातील १३ [८१.२५ टक्के] शेतकरी ५ वर्षापेक्षा कमी अनुभव असलेले ९ [५२.९४ टक्के] व २० वर्षापेक्षा जास्त अनुभव असणारे १६ [४७.०६ टक्के] शेतकरी मार्केट यार्ड फी कायद्यात ठरविल्या इतकीच घेतली जाते असे म्हणाले.

**तक्ता क्रमांक ६.१७**

**अनुभव काळ निहाय बाजार फी ची निश्चितता**

| अनुभव वर्षे | बाजार फी कायद्याप्रमाणे घेतात | बाजार फी कायद्यापेक्षा जास्त घेतात | बाजार फी अनिश्चित घेतात | एकूण |
|---|---|---|---|---|
| | ९ | ३ | ५ | १७ |
| ५ पर्यंत | [५२.९४] | [१७.६५] | [२९.४१] | [ १०० ] |
| | [२०.९३] | [१७.६५] | [ २५ ] | [२१.२५] |
| | ५ | ३ | ५ | १३ |
| ६ ते १० | [३८.४६] | [२३.०८] | [३८.४६] | [ १०० ] |
| | [११.५६] | [१७.६५] | [ २५ ] | [१६.२५] |
| | १३ | | ३ | १६ |
| ११ ते २० | [८१.२५] | - | [१८.७५] | [ १०० ] |
| | [३०.२३] | | [ १५ ] | [ २० ] |
| | १६ | ११ | ७ | ३४ |
| २० पेक्षा | [४७.०६] | [३२.३५] | [२०.५९] | [ १०० ] |
| जास्त | [३७.२१] | [६४.७०] | [ ३५ ] | [४२.५ ] |
| | ४३ | १७ | २० | ८० |
| एकूण .... | [५३.७५] | [२१.२५] | [ २५ ] | [ १०० ] |
| | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] |

६.७.४ उत्पन्न निहाय बाजार फी ची निश्चितता :

तक्ता क्रमांक ६.१८ वरून २५,००१ रुपयापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणा-या शेतक-यांपैकी एकतृतीयांश शेतक-यांना मार्केट यार्ड फी कायद्यात सांगितल्या प्रमाणे आकारली जाते की जास्त आकारली जाते हे सांगता आले नाही. अनेक उत्पन्न गटात ही हे प्रमाणे एक-चतुर्थांश इतके आहे. १०,००१ ते १५,००० रुपये उत्पन्न असणा-यांपैकी तीन [६० टक्के] शेतक-यांचे मत फी जास्त घेतली जाते असे आहे. २०,००१ ते २५,००० रुपये या उत्पन्न गटातील शेतक-यांपैकी चार [८० टक्के], १,००० रुपयापर्यंत उत्पन्न असणा-यातील तीन [७५ टक्के] व ३०,००० रुपयापेक्षा जास्त उत्पन्न असणा-यांपैकी दोन [६६.६५टक्के] शेतक-यांना पंढरपूर मार्केट यार्ड मध्ये फी कायद्याने ठरविली गेल्या इतकीच घेतली जाते असे वाटते.

६.७.५ धारणाक्षेत्र निहाय बाजार फी मधील निश्चितता :

९.५१ ते १०.५० हेक्टर धारणा क्षेत्र असणारे सर्व शेतकरी मार्केट यार्ड मध्ये फी कायद्याप्रमाणे घेतली जाते असे म्हणतात. ५.५१ ते ६.५० हेक्टर क्षेत्र असणा-यांपैकी तीन [७५ टक्के] व १.५१ ते २.५० हेक्टर जमीन असणा-यांपैकी १० [६८.६७ टक्के] शेतकरी याच मताचे आहेत. तर अर्धा हेक्टर पेक्षा कमी शेती असणा-यांपैकी निम्मेजणांना कायद्याने ठरवून दिल्यापेक्षा जास्त फी घेतली जाते असे वाटते.

६.७.६ पीक प्रकार निहाय बाजार फी मधील निश्चितता :

सर्व पीक प्रकारातील महत्तम शेतक-यांचा कल कायद्याप्रमाणे बाजार फी घेतात असे सांगणा-यांमध्ये जास्त दिसतो. बाजार फी जास्त घेतात म्हणणारे २१.७९ ते ३७.५ टक्के पर्यंत शेतकरी आहेत. अनिश्चित स्वरूपाने बाजार फी घेतात म्हणणारे सर्व पीक प्रकार घेणा-यांपैकी १२.५ ते २५.८१ टक्के शेतक-यांचे मत आहे. असे तक्ता क्रमांक ६.१९ वरून दिसून येते.

## तक्ता क्रमांक ६.१८

## उत्पन्न निहाय बाजार फी ची निश्चितता

| उत्पन्न रुपये | कायद्याप्रमाणे बाजार फी घेतात | बाजार फी कायद्यातील तरतुदी पेक्षा जास्त घेतात | बाजार फी अनिश्चित घेतात | एकूण |
|---|---|---|---|---|
| १,००० पर्यंत | ३<br>[ ७५ ]<br>[ ६.९७ ] | – | १<br>[ २५ ]<br>[ ५ ] | ४<br>[ १०० ]<br>[ २५ ] |
| १,००१ ते ५,००० | १४<br>[ ५६ ]<br>[ ३२.५६ ] | ४<br>[ १६ ]<br>[ २३.५४ ] | ७<br>[ २८ ]<br>[ ३५ ] | २५<br>[ १०० ]<br>[ ३१.२५ ] |
| ५,००१ ते १०,००० | ११<br>[ ४७.८४ ]<br>[ २५.५८ ] | ६<br>[ २६.०८ ]<br>[ ३५.२९ ] | ६<br>[ २६.०८ ]<br>[ ३० ] | २३<br>[ १०० ]<br>[ २८.७५ ] |
| १०,००१ ते १५,००० | १<br>[ २० ]<br>[ २.३३ ] | ३<br>[ ६० ]<br>[ १७.६५ ] | १<br>[ २० ]<br>[ ५ ] | ५<br>[ १०० ]<br>[ ६.२५ ] |
| १५,००१ ते २०,००० | ७<br>[ ५८.३३ ]<br>[ १६.२८ ] | २<br>[ १९.६७ ]<br>[ ११.७६ ] | ३<br>[ २५ ]<br>[ १५ ] | १२<br>[ १०० ]<br>[ १५ ] |
| २०,००१ ते २५,००० | ४<br>[ ८० ]<br>[ ९.३० ] | १<br>[ २० ]<br>[ ५.८८ ] | – | ५<br>[ १०० ]<br>[ ६.२५ ] |
| २५,००१ ते ३०,००० | १<br>[ ३३.३३ ]<br>[ २.३३ ] | १<br>[ ३३.३३ ]<br>[ ५.८८ ] | १<br>[ ३३.३३ ]<br>[ ५ ] | ३<br>[ १०० ]<br>[ ३.७५ ] |
| ३०,००१ पेक्षा जास्त | २<br>[ ६६.६७ ]<br>[ ४.६५ ] | – | १<br>[ ३३.३३ ]<br>[ ५ ] | ३<br>[ १०० ]<br>[ १०० ] |
| एकूण .... | ४३<br>[ ५३.७५ ]<br>[ १०० ] | १७<br>[ २१.२५ ]<br>[ १०० ] | २०<br>[ २५ ]<br>[ १०० ] | ८०<br>[ १०० ]<br>[ १०० ] |

<u>तक्ता क्रमांक ६.११</u>

<u>पीक प्रकार निहाय बाजार फी ची निश्चिती</u>

| पिक प्रकार | बाजार फी कायद्याप्रमाणे घेतात | बाजार फी कायद्यापेक्षा जास्त घेतात | बाजार फी अनिश्चित घेतात | एकूण | |
|---|---|---|---|---|---|
| | २९ | १७ | १६ | ६२ | |
| नगदी | [४६.७७] | [२७.४२] | [२५.८१] | [ १०० ] | |
| | [३३.५९] | [४०.४९] | [४१.०३] | [३६.४८] | |
| | ४२ | १७ | १९ | ७८ | |
| अन्नधान्ये | [५३.८५] | [२१.७९] | [२४.३६] | [ १०० ] | |
| | [४७.१९] | [४०.४८] | [४८.७२] | [४५.८८] | |
| | ४ | ३ | १ | ८ | |
| फळे | [ ५० ] | [३७.५ ] | [१२.५ ] | [ १०० ] | |
| | [ ४.४९] | [ ७.१४] | [ २.५६] | [ ४.७१] | |
| | १४ | ५ | ३ | २२ | |
| भाजीपाला | [६३.६४] | [२२.७३] | [१३.६३] | [ १०० ] | |
| | [१५.७३] | [११.९०] | [ ७.६९] | [१२.९४] | |
| | ८९ | ४२ | ३९ | १७० | |
| ए कू ण .... | [५२.३५] [१००] | [२४.७१] [१००] | [२२.९४] [१००] | [ १०० ] | [१००] |

<u>टीप</u> :- या टेबल मधील एक शेतकरी एकापेक्षा अनेक पिक प्रकार घेतो. त्यामुळे प्रत्येक पिक प्रकारानुसार त्याचे मत घेतले आहे.

## ६.८ <u>बाजारातील सततची कपात</u> :

शेतक-यास शेतमाल विक्री करताना विविध [फी] आकार द्यावे लागत असतात. कमिशन मार्फत नेहमीच्या कपाती शेतक-यांकडून किती प्रमाणात वसूल केल्या जातात याचा अभ्यास येथे केला आहे. अभ्यासातील ऐंशी शेतक-यांपैकी ४७ [५८.७५ टक्के] शेतक-यांच्या मते कायद्यानुसार

कमिशन एजंट कपावट करतो. सव्वीस [३२ टक्के] शेतक-यांच्या मते ही कपावट कायद्यातील तरतुदीपेक्षा जास्त प्रमाणात केली जाते. यासाठी कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे महत्वाचे वाटते. एकूण शेतक-यापैकी सात [८.७५टक्के] शेतक-यांनी कोणतीही प्रतिक्रीया दर्शविली नाही.

६.८.१ <u>शिक्षण निहाय बाजारातील सततची कपावट :</u>

उच्च शिक्षितापैकी ७ [७० टक्के] शेतक-यांना प्राथमिक शिक्षण गटातील २१ [६५.६२ टक्के] जणांना व माध्यमिक शिक्षण घेतलेल्यापैकी १२ [५२.१७ टक्के] शेतक-यांना बाजारात कमिशन एजंट कायद्यानुसारच बिलातून कपावट करतो असे वाटते. पण कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा कमिशन एजंट जास्त कपावट करतो असे म्हणणा-यांचे प्रमाण वाढत्या शिक्षणाबरोबर कमी होत जाते असे तक्ता क्रमांक ६.२० वरून दिसून येते.

६.८.२ <u>व्यवसाय निहाय बाजारातील सततची कपावट :</u>

तक्ता क्रमांक ६.२१ वरून असे दिसते की, इतर व्यवसाय करणा-या शेतक-यापैकी १२ [८० टक्के] शेतकरी कमिशन एजंट कायद्याप्रमाणे बिलातून आकार कापून घेतो असे मत मांडतात. मुख्यत्वे मजूरी करणारे शेतकरी मात्र सारख्या संख्येने कमिशन एजंट करीत असलेल्या कपावटी बद्दल तीनही बाबतीत मत प्रदर्शित करतात.

६.८.३ <u>अनुभव कालानुसार बाजारातील सततची कपावट :</u>

२० वर्षापर्यंत अनुभव काळ असणा-या तीन गटातील शेतकरी वाढत्या प्रमाणात असे सांगतात की, कमिशन एजंट कायद्याने ठरवून दिलेले आकारच बिलातून वजा करतो व घटत्याप्रमाणात या शेतक-यांना कमिशन एजंट कायद्यातील तरतुदीपेक्षा जास्त वजावट करतो असे वाटते. २० वर्षापर्यंत अनुभव असणा-या

तीन गटातील शेतक-यांनी वाढत्या प्रमाणात कपातीबद्दल १८ [५२.८४टक्के] शेतक-यांना कमिशन एजंट कारणाने ठरवून दिलेले आकारच जास्त कपात करतो असे वाटते.

तक्ता क्रमांक ६.२०

शिक्षण निहाय बाजारातील सततची कपात

| शिक्षण | बाजारात सततची कपात कायद्याने होते | सततची कपात कायद्यापेक्षा जास्त होते | काहिही मत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| | ७ | ६ | २ | १५ |
| निरक्षर | [४६.६७] | [ ४० ] | [१३.३३] | [ १०० ] |
| | [१४.८९] | [२३.०८] | [२८.५७] | [१८.७५] |
| | २१ | १० | १ | ३२ |
| प्राथमिक | [६५.६२] | [३१.२५] | [ ३.१३] | [ १०० ] |
| | [४४.६८] | [३८.४६] | [१४.२८] | [ ४० ] |
| | १२ | ७ | ४ | २३ |
| माध्यमिक | [५२.१७] | [३०.४३] | [१७.४०] | [ १०० ] |
| | [२५.५३] | [२६.९२] | [५७.१५] | [२८.७५] |
| | ७ | ३ | | १० |
| उच्च | [ ७० ] | [ ३० ] | [ - ] | [ १०० ] |
| | [१४.८९] | [११.५४] | | [१२.५ ] |
| | ४७ | २६ | ७ | ८० |
| एकूण ... | [५८.७५] | [३२.५ ] | [ ८.७५] | [ १०० ] |
| | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] |

## तक्ता क्रमांक ६.२१

## व्यवसायनिहाय बाजारातील सततची वजावट

| व्यवसाय | कायद्याप्रमाणे वजावट करतात | कायद्यापेक्षा जास्त वजावट करतात | काहिही मत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| | ३४ | २३ | ५ | ६२ |
| शेती | [५४.८४] | [३७.१०] | [ ८.०६] | [१०० ] |
| | [७२.३४] | [८८.४६] | [७१.४३] | [७७.५ ] |
| | १ | १ | १ | ३ |
| मजुरी व शेती | [३३.३३] | [३३.३३] | [३३.३४] | [१०० ] |
| | [ २.१३] | [ ३.८५] | [१४.२९] | [ ३.७५] |
| | १२ | २ | १ | १५ |
| व्यवसाय व | [ ८० ] | [१३.३३] | [ ६.६७] | [१०० ] |
| शेती | [२५.५३] | [ ७.६९] | [१४.२९] | [१८.७५] |
| | ४७ | २६ | ७ | ८० |
| एकूण ... | [५८.७५] | [३२.५ ] | [ ८.७५] | [ १०० ] |
| | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] |

६.८.४ **वार्षिक उत्पन्न निहाय बाजारातील वजावट :**

तक्ता क्रमांक ६.२२ अन्वये १,००० रुपयापर्यंत, १०,००१ ते १५,००० रुपये आणि २०,००१ ते ३०,००० रुपये वार्षिक उत्पन्न असणा-या चार गटात कमिशन एजंट करीत असलेल्या वजावटीबद्दल कोणीही अनभिज्ञ नाही. या चार गटातील शेतक-यांत अनुक्रमे ७५ टक्के, ६० टक्के, ८० टक्के व ६८.६७ टक्के शेतकरी कमिशन एजंट कायद्याच्या तरतुदी प्रमाणेच बिलातून वजावटी करतो असे म्हणणारे आहेत.

६.८.५ **धारणाक्षेत्र निहाय बाजारातील वजावट :**

५.५१ ते ६.५० हेक्टर व ९.५१ ते १०.५० हेक्टर धारणाक्षेत्र असणा-या शेतक-यांपैकी सर्व शेतक-यांच्या मते कमिशन एजंट कायद्यानुसारच

## तक्ता क्रमांक ६.२२

## उत्पन्न निहाय बाजारातील वजावट

| उत्पन्न रुपये | बाजारातील वजावटी कायद्या- प्रमाणे होतात | बाजारातील वजावटी कायद्या पेक्षा जास्त | काहिही मत नाही | एकूण |
| --- | --- | --- | --- | --- |
| १,००० पर्यंत | ३<br>[ ७५ ]<br>[ ६.३८] | १<br>[ २५ ]<br>[ ३.८५] | - | ४<br>[ १०० ]<br>[ ५ ] |
| १,००१ ते ५,००० | १२<br>[ ४८ ]<br>[२५.५३] | १०<br>[ ४० ]<br>[३८.४५] | ३<br>[ १२ ]<br>[४२.८७] | २५<br>[ १०० ]<br>[३१.२५] |
| ५,००१ ते १०,००० | १३<br>[५६.५२]<br>[२७.६६] | ८<br>[३४.७८]<br>[३०.७७] | २<br>[ ८.७०]<br>[२८.५७] | २३<br>[ १०० ]<br>[२८.७५] |
| १०,००१ ते १५,००० | ३<br>[ ६० ]<br>[ ६.३८] | २<br>[ ४० ]<br>[ ७.६९] | [ - ] | ५<br>[ १०० ]<br>[ ६.२५] |
| १५,००१ ते २०,००० | ८<br>[६६.६७]<br>[१७.०२] | ३<br>[ २५ ]<br>[११.५४] | १<br>[ ८.३३]<br>[१४.२८] | १२<br>[ १०० ]<br>[ १५ ] |
| २०,००१ ते २५,००० | ४<br>[ ८० ]<br>[ ८.५१] | १<br>[ २० ]<br>[ ३.८५] | [ - ] | ५<br>[ १०० ]<br>[ ६.२५] |
| २५,००१ ते ३०,००० | २<br>[६६.६७]<br>[ ४.२६] | १<br>[३३.३३]<br>[ ३.८५] | [ - ] | ३<br>[ १०० ]<br>[ ३.७५] |
| ३०,००१ पेक्षा जास्त | २<br>[६६.६७]<br>[ ४.२६] | [ — ] | १<br>[३३.३३]<br>[१४.२८] | ३<br>[ १०० ]<br>[ ३.७५] |
| एकूण ... | ४७<br>[५८.७५]<br>[ १०० ] | २६<br>[३२.५ ]<br>[ १०० ] | ७<br>[ ८.७५]<br>[ १०० ] | ८०<br>[ १०० ]<br>[ १०० ] |

कपावटी करतो. १०.५१ हेक्टर पेक्षा जास्त जमीन असणा-यांपैकी ४ [८०टक्के], १.५१ ते २.५० हेक्टर जमीन असणा-यांपैकी १० [६६.६७ टक्के] व ६.५१ ते ८.५ हेक्टर क्षेत्र असणा-या दोन गटातील प्रत्येकी ३ [६० टक्के] शेतकरी याच मताचे आहेत.

६.८.६ <u>पीक प्रकार निहाय बाजारातील कपावट</u> :

तक्ता क्रमांक ६.२३ मध्ये प्रत्येक शेतकरी एक वा अनेक पीक प्रकार घेतो त्यामुळे प्रत्येक पीक प्रकारानुसार त्याचे बाजारातील कपावटीबाबत मत नमुद केले आहे. कायद्यानुसार बाजारातील कपावट करतात म्हणणारे सर्व पीक प्रकारामध्ये ५९ ते ६८ टक्के शेतकरी आहेत. नियमापेक्षा जास्त बाजार फी घेतात म्हणणारे शेतकरी सर्व पीक प्रकारामध्ये २७.२७ ते ३७.५ टक्के आहेत. काहिही मत नसणा-यांपैकी ८ [८८.८९टक्के] शेतकरी नगदी व अन्नधान्य ही पीके घेतात.

तक्ता क्रमांक ६.२३

पीक प्रकार निहाय बाजारातील कपावट

| पीक प्रकार | बाजारातील कायद्यानुसार कपावटी होतात | बाजारात कायद्या पेक्षा जास्त कपावटी होतात | काहिही मत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| अन्नधान्ये | ४८<br>[६१.५४]<br>[ ३.८१] | २५<br>[३२.०५]<br>[४४.६५] | ५<br>[ ६.४१]<br>[५५.५६] | ७८<br>[ १०० ]<br>[४५.८८] |
| नगदी | ३७<br>[५९.६८]<br>[३५.२४] | २२<br>[३५.४८]<br>[३९.२९] | ३<br>[ ४.८४]<br>[३३.३३] | ६२<br>[ १०० ]<br>[३६.४७] |
| भाजीपाला | १५<br>[६८.१८]<br>[१४.२९] | ६<br>[२७.२७]<br>[१०.७१] | १<br>[ ४.५५]<br>[११.११] | २२<br>[ १०० ]<br>[१२.९४] |
| फळे | ५<br>[६२.५ ]<br>[ ४.७६] | ३<br>[३७.५ ]<br>[ ५.३६] | - | ८<br>[ १०० ]<br>[ ४.७१] |
| एकूण | १०५<br>[६१.७६]<br>[ १०० ] | ५६<br>[३२.९४]<br>[ १०० ] | ९<br>[ ८.६४]<br>[ १०० ] | १७०<br>[ १०० ]<br>[ १०० ] |

## ६.९ शेतमाल विक्रीसाठीचा कालावधी :

शेतमला बाजारात नेल्या नंतर विक्री होण्यास किती कालावधी लागतो याची विचारणा केली असता ७३ [९१.२५ टक्के] शेतक-यांच्या मतानुसार शेतमाल आठवडयाभरात विक्री केला जातो. तर सहा [७.५ टक्के] शेतक-यांच्या मते विक्री होण्यास एक महिना लागतो. तीन महिने विक्री कालावधी लागतो असे एका शेतक-याने सांगितले.

### ६.९.१ शिक्षण निहाय शेतमाल विक्रीचा कालावधी :

तक्ता क्रमांक ६.२४ वरून माध्यमिक शिक्षण गटातील सर्व शेतक-यांच्या मते मार्केटयार्ड मध्ये नेलेला शेतमाल कमिशन एजंट कडून त्वरीत विक्री होतो. उच्च शिक्षितामध्ये अशा मताचे ९ [९० टक्के], प्राथमिक शिक्षितामध्ये २८ [८७.५० टक्के] व निरक्षरामध्ये १३ [८६.६७ टक्के] शेतकरी आहेत.

तक्ता क्रमांक ६.२४

शिक्षण निहाय विक्री कालावधी

| शिक्षण | आठवडयामध्ये विक्री | एक महिन्यात विक्री | तीन महिन्यात विक्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| निरक्षर | १३ [८६.६७] [१७.८०] | २ [१३.३३] [३३.३३] | - | १५ [१००] [१८.७५] |
| प्राथमिक | २८ [८७.५] [३८.३६] | ३ [९.३८] [५०] | १ [३.१२] [१००] | ३२ [१००] [४०] |
| माध्यमिक | २३ [१००] [३१.५१] | - | - | २३ [१००] [२८.७५] |
| उच्च | ९ [९०] [१२.३३] | १ [१०] [१६.६७] | - | १० [१००] [१२.५] |
| एकूण .... | ७३ [९१.२५] [१००] | ६ [७.५] [१००] | १ [१.२५] [१००] | ८० [१००] [१००] |

### ६.९.२ व्यवसाय निहाय शेतमालाची विक्री कालावधी :

तक्ता क्रमांक ६.२५ नुसार त्वरीत शेतमालाची विक्री होते असे मत असणारे सर्व व्यवसाय गटातून बहुसंख्य [६६.६७ ते ९६.७७ टक्के] शेतकरी आहेत. एक महिना शेतमाल विक्री कालावधी सांगणाऱ्यांमध्ये सर्व व्यवसाय गटातील ३ ते ३३ टक्के शेतकरी आहेत.

**तक्ता क्रमांक ६.२५**

**व्यवसायनिहाय विक्री कालावधी**

| व्यवसाय | [त्वरीत] एक आठवडा | | एक महिना | | तीन महिने | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शेती | ६० [९६.७७] [८२.२०] | | २ [३.२३] [३३.३३] | | [ – ] | | ६२ [१०० ] [७७.५] | |
| मजुरी व शेती | २ [६६.६७] [२.७४] | | १ [३३.३३] [१६.६७] | | [ – ] | | ३ [१०० ] [३.७५] | |
| व्यवसाय व शेती | ११ [७३.३३] [१५.०७] | | ३ [२० ] [५० ] | | १ [६.६७] [१०० ] | | १५ [१०० ] [१८.७५] | |
| एकूण .... | ७३ [९१.२५] | [१००] | ६ [७.५ ] | [१००] | १ [१.२५] | [१००] | ८० [१०० ] | [१००] |

### ६.९.३ अनुभव काळ निहाय शेतमाल विक्री कालावधी :

तक्ता क्रमांक ६.२६ वरून ११ ते २० वर्षे अनुभव काळ असलेले सर्व शेतकरी ६ ते १० वर्षे अनुभव गटातील १२ [९२.३१ टक्के], २० वर्षापेक्षा जास्त अनुभव असणाऱ्यापैकी ३१ [९१.१८ टक्के] व ५ वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या शेतकऱ्यातील १४ [८२.३५ टक्के] शेतकरी कमिशन एजंट शेतमाल

त्वरीत [एक आठवडयात] विक्री करतो असे मत प्रदर्शित करतात. तर वाढत्या अनुभवाबरोबर शेतमाल विकावयास एक महिना कालावधी लागतो असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण घटते आहे.

तक्ता क्रमांक ६.२६

अनुभव काळ निहाय शेतमाल विक्री कालावधी

| अनुभव वर्षे | आठवडयात शेत मालाची विक्री होते | एक महिन्यात शेतमालाची विक्री होते | तीन महिन्यात शेतमालाची विक्री होते | एकूण |
|---|---|---|---|---|
| | १४ | ३ | | १७ |
| ५ पर्यंत | [८२.३५] | [१७.६५] | - | [ १०० ] |
| | [१९.१८] | [ ५० ] | | [२१.२५] |
| | १२ | १ | | १३ |
| ६ ते १० | [९२.३१] | [ ७.६९] | - | [ १०० ] |
| | [१६.४४] | [१६.६६] | | [१६.२५] |
| | १६ | | | १६ |
| ११ ते २० | [ १०० ] | - | - | [ १०० ] |
| | [२१.९२] | | | [ २० ] |
| | ३१ | २ | १ | ३४ |
| २० पेक्षा | [९१.१८] | [ ५.८८] | [ २.९४] | [ १०० ] |
| जास्त | [४२.४६] | [३३.३४] | [ १०० ] | [४२.५ ] |
| | ७३ | ६ | १ | ८० |
| एकूण .... | [९१.२५] | [ ७.५ ] | [ १.२५ ] | [ १०० ] |
| | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] |

६.९.४ उत्पन्न निहाय विक्री कालावधी :

एक हजार रुपयांपर्यंत, ५,००१ ते १०,००० आणि २०,००१ रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पाच गटातील सर्व शेतकरी कमिशन एजंट त्यांचा शेतमाल त्वरीत विकून देतो असे म्हणणारे आहेत. तर

१०,००१ ते १५,००० रुपये उत्पन्न गटातील दोन [४० टक्के], १,००१ ते ५,००० रुपये उत्पन्न गटातील तीन [१२ टक्के] आणि १५,००१ ते २०,००० रुपये उत्पन्न गटातील एक [८.३३ टक्के] शेतक-यांच्यामते कमिशन एजंट त्यांच्या शेतमाल विक्रीला महिन्याभराचा कालावधी लावतो.

६.९.५ __धारणक्षेत्र निहाय विक्री कालावधी :__

अर्धा हेक्टर पेक्षा कमी, १.५१ ते २.५०, ५.५१ ते ६.५०, ७.५१ ते ८.५० आणि ९.५१ ते १०.५० हेक्टर धारणक्षेत्र असणारे सर्व शेतकरी कमिशन एजंटकडून त्यांचा शेतमाल त्वरीत विकला जातो असे म्हणणारे आहेत. तर २.५१ ते ३.५० हेक्टर धारणक्षेत्र असणा-यांपैकी १० [९०.९१टक्के], ३.५१ ते ४.५० हेक्टर गटातील ८ [८८.८९ टक्के], ४.५१ ते ५.५० हेक्टर जमीन असणा-यांपैकी सात [८७.५० टक्के], अर्धा हेक्टर ते दीड हेक्टर जमीन असणा-यांपैकी ११ [८४.६२ टक्के] व ६.५१ ते ७.५० व १०.५१ हेक्टर पेक्षा जास्त जमीन असणा-या दोन गटातील प्रत्येकी चार [८० टक्के] शेतकरी त्याच मताचे आहेत.

६.९.६ __पीक प्रकार निहाय विक्री कालावधी :__

तक्ता क्रमांक ६.२७ वरुन असे दिसते की, भाजीपाला पिकविणा-या शेतक-यातील वीस [९०.९१ टक्के], अन्नधान्ये पिकविणा-यांपैकी ६९ [८८.४६टक्के], नगदी पीके घेणा-यातील ५४ [८७.१० टक्के] आणि फळे पिकविणा-या शेतक-यांमधील ■ सहा [७५.८० टक्के] लोक त्यांच्या शेतमालास कमिशन एजंट त्वरीत बाजारपेठ उपलब्ध करुन देतो अशा मताचे आहेत.

६.१० __निर्यातदार व इतर एजन्सीमार्फत शेतमालाची प्रत्यक्ष विक्रीबाबत मत :__

कमिशन एजंट व व्यापारी यांच्या मार्फत शेतमालाची विक्री करण्यात शेतक-यांना कोणत्या अडचणी सोसाव्या लागतात ते या प्रकरणाच्या मागील

**तक्ता क्रमांक ६.२७**

**पीक प्रकार निहाय विक्री कालावधी**

| पीक प्रकार | शेतमालाची आठवड्यात विक्री | शेतमालाची महिन्यात विक्री | शेतमालाची तीन महिन्यात विक्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| | ६९ | ८ | १ | ७८ |
| धन्यधान्ये | [८८.४६] | [१०.२६] | [१.२८] | [१००] |
| | [४६.३१] | [४४.४४] | [३३.३३] | [४५.८८] |
| | ५४ | ७ | १ | ६२ |
| नगदी | [८७.१०] | [११.२९] | [१.६१] | [१००] |
| | [३६.२४] | [३८.८९] | [३३.३३] | [३६.४७] |
| | २० | २ | | २२ |
| भाजीपाला | [९०.९१] | [९.०९] | - | [१००] |
| | [१३.४२] | [११.११] | | [१२.९४] |
| | ६ | १ | १ | ८ |
| फळे | [७५] | [१२.१] | [१२.५] | [१००] |
| | [४.०३] | [५.५६] | [३३.३३] | [४.७१] |
| | १४९ | १८ | ३ | १७० |
| एकूण.... | [८७.६५] | [१०.५९] | [१.७६] | [१००] |

दोन विभागात अभ्यासले. त्यापैकी टक्के शेतक-यांच्या मते व्यापारी त्यांचा शेतमाल विकत असताना आजहि दुराचार करतो. एकतृतीयांश शेतक-यांचे मत असे होते की कमिशन एजंट कायद्याने बांधून दिल्यापेक्षा जास्त कपात करतो. शेतक-याचा शेतमाल म्हणून व्यापारी अथवा कमिशन एजंट मार्फत न विकता पंढरपूर तालुक्या बाहेर शेतमाल पाठविणाऱ्या निर्यातदारामार्फत अथवा एखाद्या एजन्सी मार्फत विकला तर शेतक-याचे हे शोषण थांबेल का हे पहाण्यासाठी शेतक-यांना त्यांच्या शेतमालाची विक्री कशी करणे आवडेल हे आजमावून पाहिले. एकूण पैकी शेतक-यां-

पैकी ४६ [५७.५० टक्के] शेतक-यांना अशाप्रकारे निर्यातदाराला अथवा एजन्सीला प्रत्यक्ष विक्रीकरणे जास्त सोयीस्कर वाटते. तेवीस [२८.७५टक्के] शेतक-यांना याबद्दल निश्चित मत प्रदर्शित करता आले नाही. तर अकरा [१३.७५ टक्के] शेतक-यांना यापध्दतीने त्यांच्या अडचणी सुटणार नाहीत असे वाटते.

यावरून असे दिसते की, सरकारने शेतक-यांना प्रत्यक्ष विक्री करण्यास मुभा दिली तर त्यांच्या अनेक समस्या सुटतील.

६.१०.१ <u>शिक्षण निहाय प्रत्यक्ष विक्रीबाबत मत :</u>

तक्ता क्रमांक ६.२८ नुसार माध्यमिक शिक्षण पातळीपर्यंतच्या तीन गटातील शेतक-यांना वाटल्याप्रमाणात असे वाटते की, त्यांना शेतमालाची प्रत्यक्ष विक्री करु दिल्यास त्यांच्या समस्या सुटतील. पण निरक्षरांमध्ये ४६.६७ टक्के, उच्च शिक्षितामध्ये तीस टक्के, माध्यमिकामध्ये २६.०९ टक्के व प्राथमिक शिक्षितामध्ये पंचवीस टक्के शेतकरी प्रत्यक्ष विक्री बाबत निर्णयाने काहीच सांगू न शकल्यामुळे गोंधळात पडलेले दिसतात.

६.१०.२ <u>व्यवसाय निहाय प्रत्यक्ष विक्रीबाबत मत :</u>

तक्ता क्रमांक ६.२९ वरून प्रत्यक्ष विक्री हवीशी वाटणा-यांमध्ये सर्वात जास्त ३५ [७६.०९ टक्के] लोक फक्त शेती करतात. तीन[५.२६टक्के] शेतकरी मजूरी व आठ [१४.०४ टक्के] शेतकरी इतर व्यवसाय करणारे आहेत. प्रत्यक्ष विक्रीचा अव्हेर करणारे ७ [७३.६४ टक्के] लोक फक्त शेती व चार [२६.६७ टक्के] लोक इतर व्यवसाय करणारें आहेत. प्रत्यक्ष विक्रीबाबत २० [८६.९६ टक्के] फक्त शेती व ३८ [११.५४ टक्के] इतर व्यवसाय करणारे स्थितप्रज्ञ दिसले.

## तक्ता क्रमांक ६.२८

## शिक्षण निहाय प्रत्यक्ष विक्री बाबत मत

| शिक्षण | प्रत्यक्ष विक्री हवीशी वाटते | प्रत्यक्ष विक्री हवीशी वाटत नाही | प्रत्यक्ष विक्री बाबत काही सांगता येत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| | ७ | १ | ७ | १५ |
| निरक्षर | [४६.६७] | [ ६.६७] | [४६.६७] | [ १०० ] |
| | [१५.२२] | [ ९.०९] | [३०.४३] | [१८.७५] |
| | १९ | ५ | ८ | ३२ |
| प्राथमिक | [५९.३८] | [१५.६३] | [ २५ ] | [ १०० ] |
| | [४१.३ ] | [४५.४५] | [३४.७८] | [ ४० ] |
| | १४ | ३ | ६ | २३ |
| माध्यमिक | [६०.८७] | [१३.०४] | [२६.०९] | [ १०० ] |
| | [३०.४३] | [२७.२७] | [२६.०९] | [२८.७५] |
| | ५ | २ | ३ | १० |
| उच्च | [ ५० ] | [ २० ] | [ ३० ] | [ १०० ] |
| | [१०.८७] | [१८.१८] | [१३.०४] | [१३.५ ] |
| | ४६ | ११ | २३ | ८० |
| एकूण .... | [५७.५ ] | [१३.७५] | [२८.७५] | [ १०० ] |
| | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] | [ १०० ] |

## तक्ता क्रमांक ६.२९

## व्यवसाय निहाय प्रत्यक्ष विक्रीबाबत मत

| व्यवसाय | प्रत्यक्ष विक्री हवीशी वाटते | प्रत्यक्ष विक्री हवीशी वाटत नाही | काही सांगता येत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| शेती | ३५ | ७ | २० | ६२ |
| | [५६.४५] | [११.२९] | [३२.२६] | [ १०० ] |
| | [७६.०९] | [६३.६४] | [८६.९६] | [७७.५ ] |
| | ३ | | | ३ |
| मजुरी व शेती | [ १०० ] | [ - ] | [ - ] | [१०० ] |
| | [ ६.५२] | | | [ ३.७५] |
| | ८ | ४ | ३ | १५ |
| व्यवसाय व | [५३.३४] | [२६.६७] | [ २० ] | [ १०० ] |
| शेती | [१७.३९] | [३६.३६] | [१३.०४] | [१८.७५] |
| | ४६ | ११ | २३ | ८० |
| एकूण .... | [५७.५ ][१००] | [१३.७५] [१००] | [२८.७५][१००] | [ १०० ][१००] |

६.१०.३ <u>अनुभव काळ निहाय प्रत्यक्ष विक्रीबाबत मत :</u>

वीस वर्षापेक्षा जास्त अनुभव असणा-यांपैकी २२ [६४.७१ टक्के], ६ ते १० वर्षे अनुभव असलेल्या शेतक-यातील ८ [६१.५४ टक्के], ११ ते २० वर्षे अनुभव गटातील ८ [५० टक्के] व पाच वर्षे पर्यंत अनुभव असणा-यांपैकी ८ [४७.०६ टक्के] शेतकरी निर्यातदार व एजन्सीमार्फत शेतमालाची प्रत्यक्ष विक्री करण्याच्या बाजूने कौल देतात.

६.१०.४ <u>वार्षिक उत्पन्न निहाय प्रत्यक्ष विक्रीबाबत मत :</u>

तक्ता क्रमांक ६.३० वरुन असे दिसते की, १०,००१ ते १५,००० रुपये उत्पन्न गटातील कोणीही शेतकरी या प्रश्नाबाबत संभ्रमावस्थेत नाहीत. तर १,००० रुपयांपर्यंत उत्पन्न असणारे व २०,००१ ते ३०,००० रुपये उत्पन्न असणा-या दोन गटातील शेतकरी या प्रश्नाच्या विरोधात नाहीत. २५,००० रुपयापर्यंत उत्पन्न असणा-या सहा उत्पन्न गटातील निम्म्यापेक्षा जास्त शेतकरी प्रत्यक्ष विक्री करण्याच्या बाजूचे आहेत. २५,००१ रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असणा-या दोन गटातील शेतकरी मात्र एकतृतिआंश संख्येने प्रत्यक्ष विक्रीच्या बाजूचे आहेत.

६.१०.५ <u>धारणाक्षेत्र निहाय प्रत्यक्ष विक्रीबाबत मत :</u>

अर्धा हेक्टर पर्यंत शेती असणारे सर्व शेतकरी निर्यातदार व इतर एजन्सी मार्फत शेतमालाची प्रत्यक्ष विक्री करण्याच्या बाजूचे आहेत. ६.५१ ते ७.५० हेक्टर धारणा क्षेत्र असणा-यांपैकी ४ [८० टक्के], ५.५१ ते ६.५० हेक्टर जमीन असणा-यांपैकी तीन [ ७५ टक्के ], अर्धा हेक्टर ते दीड हेक्टर जमीन धारण करणा-यांपैकी ९ [ ६९.२३ टक्के ] शेतकरी आपल्या शेतमालाची प्रत्यक्ष विक्री करु इच्छितात. मात्र ४.५१ ते ५.५० हेक्टर धारणा क्षेत्र असणा-यांपैकी ४ [ ५० टक्के ]. ३.५१ ते ४.५० हेक्टर जमीन बाळगणा-यांपैकी ५ [ ४४.४५ टक्के ] व ७.५१ ते

## तक्ता क्रमांक ६.३०

## उत्पन्न निहाय प्रत्यक्ष विक्री बाबत मत

| उत्पन्न [रुपये] | प्रत्यक्ष विक्री हवीशी वाटते | प्रत्यक्ष विक्री हवीशी वाटत नाही | प्रत्यक्ष विक्री बाबत काही सांगता येत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १,००० पर्यंत | २<br>[ ५० ]<br>[ ४.३५] | - | २<br>[ ५० ]<br>[ ८.७० ] | ४<br>[ १०० ]<br>[ २५ ] |
| १,००१ ते ५,००० | १३<br>[ ५२ ]<br>[२८.२७] | ६<br>[ २४ ]<br>[५४.५५] | ६<br>[ २४ ]<br>[२६.०९] | २५<br>[ १०० ]<br>[३१.२५] |
| ५,००१ ते १०,००० | १६<br>[६९.५७]<br>[३४.७८] | १<br>[ ४.३५]<br>[ ९.०९] | ६<br>[२६.०८]<br>[२६.०९] | २३<br>[ १०० ]<br>[२८.७५] |
| १०,००१ ते १५,००० | ३<br>[ ६० ]<br>[ ६.५२] | २<br>[ ४० ]<br>[१८.१८] | [ - ] | ५<br>[ १०० ]<br>[ ६.२५] |
| १५,००१ ते २०,००० | ६<br>[ ५० ]<br>[१३.०४] | १<br>[ ८.३३]<br>[ ९.०९] | ५<br>[४१.६७]<br>[२१.७३] | १२<br>[ १०० ]<br>[ १५ ] |
| २०,००१ ते २५,००० | ४<br>[ ८० ]<br>[ ८.७० ] | [ - ] | १<br>[ २०]<br>[ ४.३५] | ५<br>[ १०० ]<br>[ ६.२५] |
| २५,००१ ते ३०,००० | १<br>[३३.३३]<br>[ २.१७] | - | २<br>[६६.६७]<br>[ ८.७० ] | ३<br>[ १०० ]<br>[ ३.७५] |
| ३०,००१ पेक्षा जास्त | १<br>[३३.३३]<br>[ २.१७] | १<br>[३३.३३]<br>[ ९.०९] | १<br>[३३.३३]<br>[ ४.३४] | ३<br>[ १०० ]<br>[ ३.७५] |
| एकूण .... | ४६<br>[५७.५ ]<br>[ १०० ] | ११<br>[१३.७५]<br>[ १०० ] | २३<br>[२८.७५]<br>[ १०० ] | ८०<br>[ १०० ]<br>[ १०० ] |

८.५० हेक्टर आणि १०.५१ हेक्टर पेक्षा जास्त जमीन असणा-यांपैकी प्रत्येकी दोन [५० टक्के] शेतकरी या बाबतीत निश्चित उत्तर देऊ शकले नाहीत.

६.१०.६ <u>पीक प्रकार निहाय प्रत्यक्ष विक्री बाबत मत :</u>

भाजीपाला पिकविणा-यांपैकी १४ [६७.६४ टक्के], अन्नधान्ये पिकविणा-या शेतक-यांमधील २९ [६२.८२ टक्के], नगदी पीके घेणा-यांपैकी ३३ [५३.२३ टक्के] आणि फळबागा असणा-यांपैकी ४ [५० टक्के] शेतक-यांना निर्यातदारामार्फत अथवा एजन्सीमार्फत शेतमालाची प्रत्यक्ष विक्री करण्यात रस आहे.

६.११ <u>पंढरपूर कृषि उत्पन्न बाजाराबाबत कृषकांच्या अडचणी :</u>

शेतक-यांच्या मार्केटयार्डबाबत समस्या व अडचणी समजावून घेण्याचा प्रयत्न केला तेंव्हा असे दिसून आले की, मार्केट यार्डमध्ये गेल्यानंतर लागणा-या किमान सोईही कृषि उत्पन्न बाजार समिती आपल्या सभासदांना उपलब्ध करून देऊ शकली नाही. शेतक-यांनी आपला शेतमाल मार्केट यार्डमध्ये आणल्यावर त्यांना व त्यांच्या शेतमालाला पाऊस व भटक्या जनावरांपासून समिती संरक्षण देऊ शकत नाही ही गंभीर बाब आहे. अनेक शेतक-यांच्या मते मार्केट यार्डमध्ये विश्राम गृहाचा अभाव आहे आणि शेतकरी संघटना अजूनही मूळ धरू शकली नाही हे दुर्दैवाचे आहे.

६.१२ <u>पंढरपूर बाजार आवाराबाबत शेतक-यांनी केलेल्या सूचना :</u>

कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर याच्या उत्कर्षासाठी सर्वेक्षणाखालील शेंशी कृषकांनी प्रत्येकी तीन-चार सूचना केल्या पैकी बहुतेक सूचनांचा सूर तक्रारीच्या स्वरूपाचा आहे. त्या सूचना प्राधान्याने पुढील प्रमाणे आहेत :-

१) शेतमालाचे संरक्षण व्हावे :-

शेतमाल बाजार आवारामध्ये आल्यानंतर त्याच्या संरक्षणाची समितीने हमी घ्यावी. शेतमाल ठेवण्यास पर्याप्त जागा उपलब्ध असावी. पक्षी, भटकी जनावरे, भटके चोर [उचले, भामटे] यापासून शेतमालास संरक्षण मिळावे. हमाल, काटेवाले, मांगीण, मुकादम, मुनीम, झाडू कामगार, भिकारी यांच्याकडून मालाच्या वजनापूर्वी शेतमाल फुकट उचलला जावू नये याकडे समितीने व व्यापाऱ्यांनी लक्ष द्यावे आणि हा उपद्रव बंद करावा असे मत जवळ-जवळ ५० टक्के शेतकऱ्यांनी मांडले.

२) शेतकरी निवास सोय :-

बाजार आवारात शेतकरी निवास असावे म्हणणाऱ्या शेतकऱ्यांना अद्याप निवास नाही याची खंत वाटते. म्हणून काही शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी बसायला-उठायला शेड असावे अशी मागणी केली आहे. ३८ टक्के शेतकऱ्यांच्या मते शेतकरी निवास योग्य स्थितीत ठेऊन त्याचा वापर सुरू करावा असे आहे आणि शेतकऱ्याच्या वस्तीची अडचण दूर करावी.

३) विक्री केलेल्या शेतमालाची रक्कम त्वरीत मिळावी :-

शेतमालाची पट्टी वेळच्या वेळी मिळाल्यास शेतकऱ्यांचा वेळ व त्रास यात बचत होईल. शेतमाल विक्रीचे पैसे १५ ते २० दिवसानंतर मिळतात. ते शेतमालाचा काटा झाल्यानंतर २४ तासात मिळावेत अन्यथा व्यापारी पध्दतीने व्याज शेतकऱ्यास द्यावे अशी पस्तीस टक्के शेतकऱ्यांची मागणी आहे. सहकारी संस्थेच्या ओळख पत्राच्या निमित्ताने पट्टी देण्यास विलंब केला जातो असेही शेतकऱ्यांनी सांगितले.

४) गोडावून सोय आणि ॲडव्हान्सेस :-

धान्य सुरक्षिततेसाठी व रास्तभाव मिळण्यासाठी गोदाम सोय व्हावी व साठवणुकीची समितीने हमी द्यावी असे २७.५ टक्के शेतक-यांना वाटते. वखार महामंडळ व बाजार समितीचे गोदाम असावे व शेतमालास योग्य किंमत येई पर्यंत माल तारणावर कर्जाची व्यवस्था व्हावी. सहकारी पतसंस्थे मार्फत व्यवस्थित व त्वरीत कर्ज मिळावे असेही मत शेतक-यांनी मांडले.

५) शेतमालास किफायतशीर भाव मिळावा :-

शेतमालाला रास्त भाव मिळावा अशी मागणी करताना शासनाने भाव बांधून [स्थिर किंमत] द्यावेत असेही २५ टक्के शेतक-यांनी सांगितले. शेतमालास पाडून भाव न ठरविता प्रतवारी प्रमाणे किंमत ठरवावी, किमान शेतक-याचा खर्च वजा जाता काही नफा मिळावा अशी किंमत मिळावी अशी सूचना त्यांनी केली.

६) हमालाचे वर्तन सुधारावे :-

शेतमाल चाळणीवेळी हमाल शेतमालाची नासधूस करतात. चाळणी नंतरचा मातीमाल, गाळ हमाल, महार लोक घेतात. कधीकधी शेतमाल परस्पर काढून घेतात [illegible] आणि [illegible] सहाय्याने पुन्हा आडतीत आणून शेतमाल विक्री करतात. असे करणारे हमाल "हमाली" जास्त प्रमाणात घेतात. तेंव्हा निरुपयोगी, गाळ, मातीमाल शेतक-यास परत करावा अन्यथा पुढील प्रक्रियेसाठी पाठवावा. असे २२.५ टक्के शेतक-याचे म्हणणे आहे.

७] शेतक-या समक्ष विक्री व वजन :-

शेतमालाची आवक झाल्यानंतर त्वरीत त्याची विक्री व्हावी आणि पुतवारी नंतर २५ तासात काटा व्हावा व त्याची वजन पावती शेतक-याला यावी असे वीस टक्के शेतकरी सांगत होते. एकूणच लिलाव, काटा, पट्टी एका दिवसांत शेतक-या समक्ष व्हावे असा त्यांचा आग्रह आहे.

८] जनावरांच्या पाण्याची सोय :-

जनावरांसाठी पाण्याचे हौद ठिकठिकाणी व ठराविक अंतरावर हवेत. श्री विठ्ठलाच्या वारी प्रसंगी पाणी विकत घ्यावे लागते कारण हौदावर काही गुंड लोक शेतक-यास पाणी भरण्यास मनाई करतात. याचा समितीने बंदोबस्त करावा अशी १८ टक्के शेतक-यांची मागणी आहे.

९] "रोकड बट्टा" सारख्या कपाती करू नयेत :-

व्यापा-यांकडून घेतलेल्या उचलीवर व्याज म्हणून शेतक-यांकडून शेतमाल विक्री नंतर अनाधिकृत, बेकायदेशीर अनामत रक्कम म्हणून दोन टक्के [आडत सोडून] रक्कम "जादा वटाव" वा "रोकड बट्टा" या नावा खाली कापली जाते ती घेऊ नये असे १३.७५ टक्के शेतक-यांची मागणी आहे.

१०] फळे-भाजी बाजाराबाबत तक्रारी :-

फळे व भाजीपाला या सारख्या नाशवंत शेतमालाची विक्री करण्यासाठीयेणा-या शेतक-यांची फार नाकुक होते. फळे व भाजीपाला यांच्या विक्रीसाठी येणा-या शेतमालाच्या मानाने फारच कमी जागा उपलब्ध आहे. त्यामुळे थोड्या उशिरा येणा-या शेतक-यांना जागा नाकारली जाते.

लिलाव प्रसंगी एजंट विक्रीसाठी मांडलेल्या फळापैकी व भाजीपाल्यापैकी बराच माल काढून घेतात. एजंट दहा टक्के इतके जबरदस्त कमिशन आकारतो. दादा, गुंड, मागतकरी, भिकारी यांचा फार त्रास होतो. या विक्रीच्या ठिकाणी लाईट, पाणी या सारख्या अत्यावश्यक सोयी सुध्दा अपु-या आहेत.

११] इतर सूचना :-

या महत्वाच्या सूचनाशिवाय शेतक-यांनी खालील सूचना केल्या आहेत.

[१] बाजार आवारामध्ये एखादी बँक असावी. विशेषत: "शेतकरी बँक" असावी.

[२] शेतक-यासाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था मोठया प्रमाणात व्हावी म्हणजे वारीच्या दिवशी एका रुपयाला घागर घेण्याची शेतक-यांवर पाळी येणार नाही.

[३] शेतमाल विक्रीचे पैसे शेतक-यास मिळाल्यानंतर त्या शेतक-यांना एस.टी. स्थानकापर्यंत एखादी व्यक्ती सोबत पाठवून शेतक-याचे आणि त्याच्या पैशाचे संरक्षण करावे.

[४] स्वच्छता गृहांची गैरसोय दूर करून स्वच्छता राखावी.

[५] बाजार समितीने शासनामार्फत योग्य/रास्त दरात रासायनिक खते, आधुनिक बियाणे,जंतुनाशके, औषधे वितरण करण्यासाठी स्वतंत्र विभाग उघडावा.

[६] बाजार फी, तोलाई, हमाली, चाळणी व इतर फी कायदा-प्रमाणे व शेतक-यास परवडतील अशा असाव्यात. यामध्ये वाढ करू नये.

[७] कांद्याची आवक झाल्यास त्वरीत लिलाव करावा. अन्यथा शास्त्रोक्त पध्दतीची साठवणूक सोय उपलब्ध करावी.

[८] पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार भाव आकाशवाणीवर घोषित व्हावेत.

[९] शेतक-यांना बाजार आवारात सम्यतेची वागणूक मिळावी.

[१०] व्यापा-यांच्या मालास जास्त व शेतक-याच्या मालास कमी किंमत मिळते तेंव्हा लिलाव प्रसंगी सचिव व इतर कर्मचा-यांनी शेतक-यांच्या बाजूने परिक्षक म्हणून काम करावे आणि व्यापा-याचे प्रभुत्व कमी करून शेतमाल खरेदी व विक्रीतील तफावत कमी करावी.

[११] आवारामध्ये सांस्कृतिक हॉल, बाग, हॉटेल, खानावळ, संशोधन केंद्र, आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात.

[१२] बाजार आवाराजवळ एस.टी. थांबा व्हावा.

[१३] जनावरांसाठी टाकलेला कडबा चोरून नेतात. त्याचा बंदोबस्त व्हावा.

[१४] झाडूवाले व सारवण करणा-या बायकांचा पगार शेतक-यां-कडून वसूल केला जाऊ नये.

[१५] किमान महिन्यातून एकदा "शेतकरी मेळावा" भरवून कृषि तज्ञाचे मार्गदर्शन व्हावे.

[१६] बाजार आवाराच्या समस्येकडे प्रतिनिधी हेतू पुरस्सर दुर्लक्ष करतात. तसे होऊ देऊ नये.

[१७] वारीच्या दिवशी जनावरांच्या शेणखताचा लिलाव वारी आगोदर केला जातो व हा लिलाव शेतक-यांपर्यंत जाहिर होत नाही. शेण भटक्या बाया घेऊन जातात.

[१८] राजकारणास वाव देऊ नये.

[१९] सुवाच्य, स्पष्ट अक्षरात धान्याचे भाव-फलक असावेत.

[२०] यार्ड मध्ये वाहतूक सोय समितीने किंवा शासनाने किफायतशीर दरात उपलब्ध करावी.

[२१] तक्रार निवारणासाठी वेगळा व स्वतंत्र विभाग असावा.

[२२] शेतमालाचे आवक प्रमाण अत्यल्प व विविधता असलेले असते. त्यामुळे शेतमालाची नासधूस होते. यावर उपाय म्हणून शेतक-यांमध्ये पीकाचे वाटप करुन आवक प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न करावा.

[२३] शेतमालावर नगरपालिकेने वाहतूक कर आकारु नयेत.

[२४] प्रतिवर्षी वार्षिक अहवाल छापील स्वरुपात सर्व शेतक-यांमध्ये जाहिर करावा.

[२५] बाजार आवार हे "शेतक-याचे" व्हावे.

*****